डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन, पुणें;
डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन,
बेरार (वऱ्हाड); व बडोदें, कोल्हापूर,
सावंतवाडी, व इतर संस्थानिक
विद्याखात्यांच्या अधि-
काऱ्यांनी पसंत
केलेलें

# ऋणविमोचन.

आवृत्ति दुसरी.

किंमत ४ आणे.

# ऋणविमोचन.

अर्थात्

कर्जापासून मुक्त होण्याचे उपाय.

हें पुस्तक

**बाळकृष्ण बापू आचार्य**

मुंबईच्या वृत्तांताचे कर्ते

ह्यांनीं रचिलें

तें

**दुभाषी आणि कंपनी**

ह्यांनीं

मुंबईत

"देन्हारे प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें.

---

सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी

---

सन १८९२.

---

[ हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क प्रकाशकांनीं आपल्या स्वाधीन ठेवले आहेत. ]

---

किंमत ४ आणे.

# ...प्रस्तावना.

...वरून ह्या ...ात कोणत्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे हें व्यक्त होतेंच. तरी पण, ह्या संबंधानें दोन शब्द लिहिणें जरूर आहे. पैशावांचून ह्या जगांत कोणतेंही कार्य होत नाहीं, हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. पण पुष्कळांस पैशाचा उपयोग कसा करावा हें ठाऊक नसल्यामुळें त्यांस ऋण काढणें भाग पडून सारा जन्म विपत्तींत घालवावा लागतो. तेव्हां ह्या पुस्तकांत कर्जापासून मुक्त होण्याचे उपाय सांगून अशा लोकांस उपयोगी पडावें हा आमचा उद्देश आहे. त्याचा सर्वांनीं अंशतः उपयोग करून घेतला व घेत आहेत असें ऐकण्यांत आलें तर, आह्मी व ग्रंथकर्ते कृतकृत्य मानून घेऊं.

ह्यांत प्रथमतः कर्ज व तें काढण्याची वहिवाट, कर्जासंबंधीं पूर्वीच्या लोकांचें मत, दैववाद, दीर्घदृष्टि, निरपेक्ष बुद्धि, वगैरे गोष्टींचा थोडक्यांत प्रस्ताव करून मग कर्ज काढण्यास कोण कोणतीं कारणें होतात तीं दाखविलीं आहेत. पुढें कर्जापासून होणारे अनिष्ट परिणाम दाखवून ऋणमुक्त असल्यापासून होणारे लाभ दाखविले आहेत. व शेवटीं शहाण्या लोकांनीं पोक्त विचार करून स्वानुभवपूर्वक लिहून ठेवलेल्या कांहीं गोष्टी उपसंहार ह्या प्रकरणांत सांगितल्या आहेत.

शेवटीं आमच्या विनंतीस मान देऊन आमचे परममित्र रा. रा. **बाळकृष्ण बापू आचार्य** ह्यांनीं हें पुस्तक आह्मांस निरपेक्षबुद्धीनें लिहून दिलें, त्याबद्दल आह्मीं त्यांचे फार फार आभारी आहों.

## दुसऱ्या आवृत्तीची सूचना.

अल्पकाळांतच ह्याची द्वितीयावृत्ति काढण्याचा प्रसंग आला हें पाहून आह्मास बहुत आनंद होत आहे. ह्यावरून आमचा हेतु अंशतः सिद्ध झाला असें आह्मी मोठ्या आनंदानें ह्मणूं शकतों. तेव्हां ह्या आवृत्तीचाही असाच उपयोग होईल अशी आशा आहे. ह्या आवृत्तिच्या वेळींही आमचे मित्र रा. रा. **बाळकृष्ण बापू आचार्य** ह्यांनीं पुनः पुस्तक सुधारून वाढवून दिलें त्याबद्दल त्यांचे आह्मावर जे उपकार झाले आहेत, ते व्यक्त केल्यावाचून आमच्यानें राहवत नाहीं.

दुभाषी आणि कंपनी.

*On the first Editi[on]*

'I have read with interest your little pamphlet on ऋणविमोचन, a copy of which you have been kind enough to send me, and I feel great pleasure in commending it to the notice of all, who have the interest of the people of India at heart, and who wish to raise them from their present level. Whatever be your object in publishing this book, you deserve great praise, for trying to rouse the people to a sense of themselves, by placing before them with such painful truth, their present indebtedness, arising partly from their ignorance and weakness, partly from the evil example of their betters, but mostly from their blind obedience to the pernicious customs of the society in which they live. You have, moreover, given a variety of simple rules and remedies, by observing which, all those, who wish, can free themselves or keep themselves free from debt......I hope that this will not be your first and last attempt to serve your fellow-creatures and I sincerely hope, you will follow this up by other essays on subjects, which concern the interests of the masses...... Wishing you all success in your praise-worthy undertaking and again thanking you for your kind favour."—**Anandrao Sadashiv Dalvi, M.A.**, *Assistant Master, Elphinstone High School. Bombay.*

"वि. वि. आपलें पुस्तक 'ऋणविमोचन' पोंहोचलें. त्या बद्दल मी फार आभारी आहें. मला हें पुस्तक फार आवडलें. त्याची भाषा सरळ व सोपी अशी असून विषयाचें प्रतिपादन फारच उत्तम रीतीनें केलें आहे. हें

पुस्तक सर्वांच्या उपयोगी पडण्याजोगें आहे, ह
सर्वांनीं अवश्य वाचावें. शाळांतून बक्षिसें वाटण्याच्या प्रसंगीं अधिकाऱ्यांनीं ह्या पुस्तकाचा उपयोग केला असतां फार फायदेशीर होणार आहे."—**द्वारकानाथ राघोबा तर्खडकर, हेडमास्तर, हायस्कूल, नासिक, व भाषांतरपाठमाळेचे कर्ते.**

"I have read with much pleasure your little book on 'Self extrication from debt.' The latter portion which suggests the ways and means is particularly interesting. Domestic economy would appear to be a lost art in not a few house-holds in Bombay. This circumstance makes ample room for such a book as yours. I sincerly hope it will meet with a'' due encouragement from the public."–**Vasud Gopal Bhandarkar, B. A, L. L. B.,** *High Cou Pleader, Bombay.*

"Rinavimochan (ऋणविमोचन) is a useful li tle publication full of practical advice to youn men. It will serve as an excellent prize book." **Gopal Vyankatesh Panandhikar,** *Depu Educational Inspector, Kolaba.*

"Many thanks for the copy of ऋणविमोचन you were kind enough to send me. The subject is an important one and is treated in a most interesting manner. Its style is simple and it will, I am sure, be read with great pleasure by our young boys. Cheap and useful as it is I have every reason to believe that it will be recommended by the Educational authorities as a prize book."—**R. S. Taki, B. A.,** *Deputy Educational Inspector, Marathi Schools, Bombay.*

---

# ऋणविमोचन.

*पापंकर्तमृणं कर्तं मन्यन्ते मानवाः सुखम् ।
परिणामोऽतिगहनो महतामपि नाशकृत् ॥

**ऋण**—ऋण ( कर्ज ) ह्मणजे काय हें कोणाही प्रापंचिक मनुष्यास सांगावयास पाहिजे असें नाहीं. सारा दिवस कष्ट करून त्याचा जो कांहीं मोबदला आपणांस मिळतो त्यास कष्टार्जित द्रव्य असें ह्मणतात. ह्या स्वकष्टार्जित द्रव्यानें ज्याचा उदरनिर्वाह होत नाहीं, तेवढ्यावर ज्याचें संसारकृत्य यथास्थित चालत नाहीं, ज्याचा डामडौल तेवढ्यानें पुरा होत नाहीं, त्यास तो पुरा पाडण्याकरितां अन्य उपायांची योजना करावी लागते; ह्मणजे अर्थात् त्यास दुसऱ्यापासून पैसा काढणें भाग पडतें. हेंच कर्ज.

**कर्ज काढण्याची वहिवाट.**—कर्ज काढण्याची वहिवाट फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. ही चाल आपल्याच देशांत चालू आहे असें नाहीं; तर ती सर्वत्र पसरली आहे. **वेदांत** देखील कांहीं ऋचा अशा आहेत कीं, ज्यांचा अर्थ 'हे प्रभो आह्मांस ऋण झालें आहे, त्याचा आमच्या हातून लवकर फडशा होऊंदे' असा होतो. इतकी ही कर्ज काढण्याची चाल प्राचीन आहे. **मनूनेंही** कर्जाची फेड कशी करावी, व्याज किती घ्यावें,

---

*पाप करावें, कर्ज काढावें, ह्यांत मनुष्यांस सुख वाटतें; पण त्याचा परिणाम फार गहन आहे, तो मोठमोठ्यांचाही नाश करतो.

व तें वर्णाश्रमधर्मानुसार कोणापासून कस कसें घ्यावें वगैरे इयत्ता लावून दिल्या आहेत.

**हिंदुस्थानांतील** लोकांचा अधिक भाग शेतकीवर निर्वाह करून राहणारा आहे. आणि कर्जानें अगदीं बुडून गेलेले हेच लोक फार. कर्जाचे अनिष्ट परिणाम ह्याच लोकांस अधिक नाशक होतात, इतरांस मुळींच होत नाहींत असें नाहीं. पण गरीब वर्गास कर्ज भरतां भरतां पुरे पुरे होऊन जातें. कारण सावकार लोक अडाणी लोकांस त्यांच्या अज्ञानामुळें अतिशय नाडतात. येवढेंच केवळ नव्हे तर ते आपले बंदे गुलाम आहेत असें समजून त्यांजबरोबर हव्या तशा तऱ्हेनें वागतात.

**प्राचीन काळच्या लोकांचें मत.**—सुभाषितांत देखील कर्जाविषयीं निषेधपर बहुत वचनें आढळतात. त्यांतील कांहींचा आशय वाचकांकरितां खालीं दिला आहे.—

प्रत्यक्ष विषाला विष असें ह्मणूं नये, तर मनुष्यांस जें कर्ज असतें त्यालाच खरें विष ह्मणावें. विष एका खाणा-

---

१ ह्या बाबतींत गरीब लोक विपत्तीपासून मुक्त व्हावे ह्मणून जिकडे तिकडे ब्यांका स्थापन कराव्या ह्मणून माजी हायकोर्ट जज सर डब्ल्यू वेडर्बर्न, बार्ट, ह्यांनीं कांहीं दिवसांमागें बरीच खटपट केली होती. त्यांत त्यांचा हेतु हा होता कीं, अशा ब्यांकांतून शेतकरी वगैरे गरीब लोकांस शेतकीच्या कामासाठींच पाहिजे असल्यास फार हलक्या व्याजानें द्रव्य मिळावें कीं, जेणेंकरून त्यांजवर विशेष कर्जाचा बोजा नसल्या कारणानें त्यांस शेतीचीही स्थिति सुधरतां यावी! हल्लीं पुणें वगैरे ठिकाणीं अशा कांहीं ब्यांकांची स्थापना झाली असून त्यांपासून गरीब गुरीब लोकांस बराच फायदा होत आहे. तेव्हां वेडर्बर्न साहेबांच्या प्रयत्नास थोडें बहुत यश आलें ह्मणावयाचें!

राचाच प्राण हरण करतें, परंतु ऋणरूपी विष पुत्र पौत्रादिकांचाही फडशा उडवून टाकितें, इतकें तें जालिम आहे! जाताशौच किंवा मृताशौच हीं अशौचें दहा दिवसांनीं जातात; पण ब्रह्मस्वी ( कर्जबाजारी ) हे सदा सार्वकाल सुतकी असून हव्यकव्यादि कृत्यांसही ते निरुपयोगी होऊन जातात! ब्रह्मघ्न आणि ऋणी हे दोघेही नरकार्णवांत लोळत राहतात; पैकीं ब्रह्मघ्नाची कल्पान्तीं तरी मुक्तता होईल; पण, ज्याच्यावर ब्रह्मस्व ( कर्ज ) आहे त्याला मुळींच मुक्ति मिळत नाहीं! आमचे लोक प्राचीन काळापासून ऋणाचा इतका निषेध करीत आले आहेत.

वरील सर्व उपदेशाचा गोषवारा काढला तर असें सिद्ध होईल कीं, मनुष्यावर कितीही दुर्धर प्रसंग आले तरी त्यानें ऋण ह्मणून काढूं नये. इतकें आहे तरी आज आमच्या लोकांपैकीं कितीसे ऋणविमुक्त असतील बरें? असल्यास फार थोडे! ज्यास कर्ज नाहीं त्याच्या कुटुंबांत कर्जबाजाऱ्याच्या कुटुंबापेक्षां शंभरपट शांति, सौख्य, समाधान, आणि लक्ष्मी ह्यांचा वास असतो; हें अनुभवानें पुष्कळांस ठाऊक असेल.

**सुखेच्छा**—'मला सुख नको' असें ह्मणणारा एक तरी मनुष्य ह्या भूतलावर कोणी असेल काय? ह्मणजे अर्थात् आपणांस सुख व्हावें हीच सर्वांची इच्छा! ही इच्छा स्वाभाविक सर्वांस सारखी असते. तरी सुख मिळणें किंवा न मिळणें हें ज्याचा त्याचा व्यवहार व वर्तनक्रम ह्यांवर बहुतांशीं अवलंबून असतें. ह्याच अर्थाचें समर्थन करीत होत्साते **श्रीसमर्थ रामदास** ह्मणतातः—

जगीं सर्व सूखी असा कोण आहे ?

ह्या साधुवाक्यावरून 'सर्वसुखी' असा ह्या जगांत कोणीही प्राणी मिळावयाचा नाहीं हें खरें, पण प्रयत्न करून दृढनिश्चयानें सद्वर्तन करण्याचा क्रम ठेवणें, मितव्ययी असणें, आहारविहारादि मित राखणें, प्रापंचांत सुव्यवस्था ठेवणें, सत्यावलंबन करणें वगैरे गोष्टी नेमानें, नेटानें व दृढ निश्चयानें केल्यास अधिक उण्या मानानें मनुष्यांस सुखाची प्राप्ति अवश्य करून घेतां येईल, ह्यांत संशय नाहीं. पण आमच्या देशाच्या दुर्भाग्यामुळें आज बहुत जनसमुदायाचा ओघ उलट दिशेकडे लोटत आहे. ही गोष्ट फार शोचनीय होय. वरील गोष्टींच्या दुर्लक्षामुळें संसाराचें लोढणें गळ्यांत पडल्या दिवसापासून तों मरेपर्यंत किती लोक दुःखसागरांत बुडत असतील कोण जाणें ! त्यांच्या विपत्तीला अनेक कारणें असतील. त्यांपैकींच कर्जबाजारीपणा हें एक होय. ह्या करितां कर्ज काढण्यास मनुष्य कसा प्रवृत्त होतो, कर्ज टाळण्याचे उपाय कोणते वगैरे अनेक विषयांचें उद्घाटन करून ऋणविमुक्त करून घेण्याचे अल्पसे मार्ग—आह्मांस सुचले आहेत ते—आमच्या देशबांधवांपुढें सादर करून त्यांची थोडीबहुत सेवा करावी हा ह्या छोटेखानी निबंधाचा मूळ उद्देश होय.

**दैववाद**—दैववादी ह्मणतात कीं, आपल्या सुखदुःखाला कारण आपलें दैवच समजलें पाहिजे. असें ह्मणून स्वस्थ बसतात. उद्योग करण्याचा प्रयत्नसुद्धां करीत नाहींत. कारण, त्यांचा दृढनिश्चय झालेला असतो कीं, **दैवंफलति सर्वत्र न विद्या न च पौरुषम्** पण त्यांस हें

समजत नसतें कीं, हात पाय हालविल्यावांचून आपल्यास खावयास तरी मिळेल काय? सुभाषितांत ह्मटलें आहे:—

'नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगा:'

ह्मणजे सिंह आहे आणि तो ह्मणेल कीं मी आपला निजूनच राहीन, आपलें भक्ष मिळविण्याचा कांहीं प्रयत्न करणार नाहीं, तर सावजें आपण होऊन त्याच्या तोंडांत जाऊन पडतील ह्मणतां! असें कदापि होणें नाहीं. ह्मणून मनुष्यानें सतत प्रयत्न करीत असावें. उगीच दैवाला बोल लावून स्वस्थ बसूं नये. **प्रयत्नावांचून दैव पंगु** ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं.

**दीर्घदृष्टि**—अडाणी लोकांची गोष्ट निराळी आणि सुशिक्षित सुधारलेल्या लोकांची गोष्ट निराळी. कारण दीर्घदृष्टित्व आणि सदसद्विवेक हे दोन गुण सुशिक्षित मनुष्यांत विशेष असतात. त्यामुळें ते दूरवर दृष्टि पोंहचवून पुढची तजबीज पहिल्यापासूनच करण्यास लागतात. अडाणी लोकांची नजर पायांकडे. खा, प्या, मजा करा; काय होईल तें आज करून घ्या. उद्याचें कोणी पाहिलें आहे? पण शहाणे लोक नेहमीं पुढची तजवीज करून ठेवितात. कारण त्यांस ठाऊक असतें कीं, ह्या संसारांत आपणांवर अनेक प्रसंग गुदरावयाचे असतात. दुखणें आहे, बाणें आहे, कार्यप्रयोजन आहे, हव्यकव्यादि अनेक कारणें आहेत. अशा प्रसंगाकरतां आपणांस कांहीं व्यवस्था नको का करून ठेवायला? **खा खुदळ, घाल गोंधळ,** अशांतली गोष्ट करून काय उपयोग?

**निरपेक्षबुद्धि**—मागें ह्मटलेंच आहे कीं, आपणांस गरज लागली असतां दुसऱ्याकडून जें द्रव्य आपण घेतों

त्याचें नांव कर्ज. बरें पण, आधीं आपण द्रव्य ह्मणजे काय, तें ज्याच्यापाशीं विपुल असतें त्यास लोक कसा मान देतात, पूर्वीच्या लोकांची द्रव्याच्या संबंधानें कशीं मतें होतीं, अलीकडच्या लोकांचीं कशीं आहेत वगैरे गोष्टींचा किंचित् विचार करून आपण आपल्या विषयाकडे वळूं.

प्राचीन काळीं येवढेंच नव्हे तर गेल्या शतकापर्यंत देखील युरोपखंडांत लक्ष्मीला तुच्छ मानणारे लोक बहुत होते. इतरत्रही वित्ताला तृणवत् मानणारे असे बहुत विरक्त लोक होऊन गेले असतील. आपल्या देशाकडे पाहिलें तर ह्या विषयासंबंधानें शेकडोशें ग्रंथ लिहिले गेले आहेत एवढेंच नव्हे तर, अशा विरक्त लोकांची संख्या आमच्याच देशांत फार निघेल! आमचे आधुनिक वेदांती तर आधीं जगच मिथ्या मानतात! मग त्यापुढें बापड्या लक्ष्मीचा काय पाड! ते प्रतिपादन करितात कीं संपत्ति ही सर्व अनिष्टाचें आदिकारण होय; ती अनर्थावह आहे; तिजपासून सुखाचा लेशही प्राप्त होत नाहीं; तिच्या योगानें संपत्तिवानास सदोदित काळजी वहावी लागते; तिच्या जोरावर मनुष्य असंख्य महापातकें करतो व परिणामीं नरकवास भोगितो वगैरे अनेक अरिष्टें एका द्रव्याच्या पायीं मनुष्यांस प्राप्त होतात; तस्मात् “बा रे मूढा ही धनतृष्णा सोड. अरे वेड्या! मनांत संतोषरूप समाधान वृत्ति धारण कर. पूर्वकर्मानुरूप जेवढें तुला मिळेल, तेवढ्यांतच आनंद मानून ऐस. अर्थ हा अनर्थावह आहे असें नेहमीं समजत जा. त्यापासून खरोखर सुखाचा लेशही प्राप्त होणार नाहीं. पहा कीं, धनवान पुरुषांस प्रत्यक्ष पुत्रापासूनही

भीति आहे; मग दुसरें तर काय? तस्मात् हा उपदेश चांगला चित्तांत ठसूंदे, हाच उपदेश आजपर्यंत ज्ञाते पुरुष सर्वांस सांगत आले आहेत."

**प्रापंचिकांस द्रव्याची अपेक्षा.**—हें विवेचन केवळ पारलौकिक दृष्टीनें झालें. पण आपण तर जगांत रहात आहों, तेव्हां उगीच 'सर्व मिथ्या, सर्व नाशिवंत' असें ह्मणून आपलें कसें चालेल? प्रातःकालापासून तों शयनकालपर्यंत आपणास हें पाहिजे, तें पाहिजे, हें आहेच आहे. घटकाभर कांहीं नसलें तरी चालेल. पण माध्यान्हकाळ फार कठीण आहे. त्यावांचून कोणाचें चालत नाहीं. बरें, हें सर्व मिळतें कशानें? तर द्रव्यानें. हें कोणास सांगावयास पाहिजे काय? ह्याच कारितां संसारी मनुष्याला संपत्ति हें सर्व सुखाचें व समाधानाचें परम स्थान वाटतें. ह्मणून मनुष्यास द्रव्याचा लोभ उत्पन्न होणें हें साहजिक होय. तेव्हां अन्न, वस्त्र, घरदार इत्यादि जीवितास केवळ आवश्यक अशा असंख्य गोष्टी ज्या द्रव्याच्या योगानें आपणास कांहीं विशेष आयास केल्यावांचून प्राप्त करून घेतां येतात, 'तें द्रव्य मला नको' असें कोणता प्रापंचिक मनुष्य ह्मणूं शकेल? पहा बरें, ज्याच्यापाशीं इतर साधारण जनसमूहापेक्षां फार द्रव्यसंचय असतो त्यास ह्या जगांत किती मान व प्रतिष्ठा मिळते हें सर्वांस ठाऊक आहे. ह्मटलें आहेः—

वयोवृद्धास्तपोवृद्धा ये च वृद्धा बहुश्रुताः।
सर्वे ते धनवृद्धानां द्वारि तिष्ठंति किंकराः॥ १॥

ह्मणजे वयानें वृद्ध असो, ज्ञानानें वृद्ध असो, तपानें (पापभीरु, सत्याचरणी) वृद्ध असो, पण काय उपयोग?

त्या सर्वांस धनवृद्ध जे आहेत त्यांच्या दारीं नोकराप्रमाणें हात जोडून उभे रहाण्याचा प्रसंग येतो ना? आमच्या एकाद्या आधुनिक वेदांत्यास विचारा कीं, काय हो आपण ह्मणतां कीं, सर्व मिथ्या, सर्व नाशिवंत, आणि आतां ह्या शेटीच्या येथें हात पसरायला कांहो आलांत? कीं झाली पुंगी बंद! तेव्हां सर्वांस द्रव्यसंचय करण्याची आवश्यकता आहे ह्यांत कांहीं संशय नाहीं. फार काय सांगावें? आज जगांत संपत्तिवानाची योग्यता किती मानली जाते ती पहाः—

यस्यास्ति वित्तं सनरः कुलीनः ।
स पंडितः स श्रुतिमान गुणज्ञः ॥
स एव वक्ता सच दर्शनीयः ।
सर्वे गुणाः कांचन माश्रयन्ते ॥

हे जसे फायदे आहेत तसे धनापासून तोटेही आहेत, हें विसरतां कामा नये. मदांधता, दुराचारप्रवृत्ति व्यसनासक्ति वगैरे अनर्थोत्पादक ढंग मनुष्यास द्रव्याच्या योगानें जडतात हें खरें. पण कोणतीही गोष्ट घ्या, ती दुष्ट मनुष्याच्या हातीं पडल्यास परिणाम वाईटच होणार हें उघड आहे. पण चांगलीं मनुष्यें तिचा सदुपयोगच करतील ह्यांत संशय नाहीं. हीच गोष्ट द्रव्याची. तर जें द्रव्य आपल्या मेहनतीनें आपणांस मिळेल त्याचा सद्व्यय करून त्यांत संतोष मानून रहावें, हें चांगलें कीं, फुकाचा डामडौल करून शिरावर कर्जाचा बोजा करून घेऊन फेडण्याचें सामर्थ्य नसून कोणास तोंड देखील दाखवितां येऊं नये अशी स्थिति चांगली? पहा कीं, आपण कोणाची एक पै लागत नाहीं अशी ज्या

मनुष्याची खात्री आहे त्यास किती सुख प्राप्त होत असेल बरें? पण तेच कोणाचे चार पैसे देणें आहे तर रात्रंदिवस आंगाला इंगळी कशी लागून राहते, हें पुष्कळांना स्वानुभवानें ठाऊक असेलच. तेव्हां कर्जांतून मनुष्य मोकळा झाला ह्मणजे त्यास सुख मिळालें असें कोण ह्मणणार नाहीं? तेव्हां सुखाची आवश्यकता सर्वांस आहे हें उघड झालें. पण तें साध्य करून घेण्याचे मार्ग अनेक आहेत. पैकीं शिरोलेखांतील '**ऋणविमोचन**' हा एक होय. अस्तु. एवढा प्रस्ताव पुरे आहे. आतां आपण विषयाकडे वळूं या.

## कारणें.

पहिल्यानें कर्ज काढण्याला मनुष्यास जीं कारणें होतात त्यांपैकीं कांहीं कांहीं कारणांचा आतां आपण विचार करूं.

**धनको** आणि **ऋणको**—बहुतेक जनसमाजाचें वर्तन गैरसमजाचें असतें. ते नेहमीं ह्मणतात कीं, उद्याचें कोणी पाहिलें आहे? आज 'घृतकल्या मधुकल्या' झालें ह्मणजे झालें. अशा अविचारामुळें उद्यां आपणांस कोणकोणतीं संकटें सहन करावीं लागतील, ह्याचा विचार ते मुळींच करीत नाहींत. पण शहाणे लोक नेहमीं पुढची तजवीज करून ठेवतात वगैरे मागें म्हटलेंच आहे. कर्जासंबंधीं विचार करतांना मनुष्याचे दोन वर्ग केले पाहिजेत. एक धनको आणि दुसरा ऋणको. पहिल्या वर्गांतले लोक बहुधः आपला प्रापंच नेहमीं बेताबातानें पण सुव्यवस्थितपणानें करून द्रव्यार्जन करणारे, विचारी आणि हात राखून खर्च करणारे असतात. ह्मणून त्यांच्या अंगीं आपल्या गरजा भागवून राहिलेला पैसा

दुसऱ्यास व्याजी देऊन आपला पैसा वाढविण्याचें सामर्थ्य असतें. पण दुसऱ्या वर्गांतले लोक ह्याच्या उलट ह्मणजे उडाऊ, अविचारी आणि नेहमीं पराधीन असे असतात. ह्मणून त्यांस आपल्या गरजा भागविण्यासाठीं पैशाकरतां दुसऱ्याजवळ तोंड वेंगडण्याचा प्रसंग वारंवार येतो! मनुष्यास ज्याच्या त्याच्या उत्पन्नाच्या मानानें कर्ज असणें जरूर आहे असें ह्मणतां येत नाहीं. समजा कीं एकाच ऑफिसांत दोन कारकून आहेत; पैकीं एकास मोठा पगार मिळत असून देखील तो कर्जानें अगदीं बुडून गेलेला आहे आणि दुसऱ्यास अगदीं थोडा पगार मिळतो तरी पण तो ऋणमुक्त आहे! तेव्हां कर्जाचें मान उत्पन्नावर नाहीं हें उघड झालें.

**आकस्मिक कारणें**—कधीं कधीं असें होतें कीं, कुटुंबांतील मुख्य उत्पादक मनुष्याच्या आकस्मिक मरणामुळें एकादें कुटुंब अगदीं निराश्रित होऊन जातें किंवा, देशांत दुष्काळ पडला असून अन्नोदक मोठ्या पराकाष्टेनेंही मिळत नाहीं किंवा, घरावर एकाएकीं दरोडा पडला आणि सर्वस्व हरण झालें किंवा, अग्निप्रलयामुळें घराची राखरांगोळी होऊन गेली वगैरे ज्याला आमचे लोक 'ईश्वरी क्षोभ' ह्मणतात अशा अनेक आकस्मिक कारणांमुळें कर्ज काढणें साहजिक होतें. ही नाइलाजाची गोष्ट. पण आपल्या अडाणीपणामुळें ह्मणा, अगर गैरसमजामुळें ह्मणा, अगर आपणास लोकांनीं मोठें ह्मणावें ह्मणून ह्मणा वगैरे ज्या कारणांमुळें विशेषेंकरून लोक आपल्या शिरावर कर्जाचें ओझें लादून घेत असतात, अशा मुख्य मुख्य कारणांचा आतां आपणांस विचार

कर्तव्य आहे. असे लोक आपल्या मूर्खत्वाबद्दल त्यांस दोन उपदेशपर गोष्टी सांगणारांस नेहमीं दूषणें देत असतात. ही त्यांची मोठी चूक आहे. दुसऱ्यास दुषणें देण्यापेक्षां त्यांनीं आपला स्वतःचा वर्तनक्रम हळूहळू सुधारण्याचा प्रयत्न केल्यास किती चांगलें होईल बरें?

**आद्यापेक्षां ज्याचा खर्च मोठा त्याचा होइ सदा तोटा**—ही ह्मण तर दुसऱ्या पुस्तकांतून लहान मुलें वाचतांना पुष्कळांनीं ऐकली असेल. तरी ह्या ह्मणी प्रमाणें वागणारे असे फार थोडे. पण अविचारानें उधळपट्टी केल्यामुळें कर्ज काढण्याचा प्रसंग ज्यांवर येतो अशा लोकांची संख्या आज मितीस बहुत पाहाण्यांत यइल. ते ह्मणतातः—

भस्मी भूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।
तस्मान्महाप्रयत्नेन ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ॥

ज्याला सदसद्विवेक बुद्धि आहे असा मनुष्य नेहमीं आपली जी खरी स्थिति असते तीच लोकांस दाखवितो. पण असेही लोक आहेत कीं, त्यांस घरांत खायला नसलें तरी बेहत्तर, पण बाहेर निघाले कीं 'खडेघाट'! ह्याच अर्थाची एक गुजराथींत ह्मण आहेः—

घेरना छोकरा घंटी चाटे ने उपाध्याने आटो.

किती अविचारीपणा हा! बाबांनों, लोकांस व्यर्थ भपका दाखवून काय कर्तव्य आहे? ईश्वरानें ज्या स्थितींत आपणांस ठेविलें असेल तींतच संतोष मानून रहावें हें चांगलें. ह्या विवेचनावरून असें कोणी समजूं नये कीं, मनुष्यानें कांहींच उद्योग करूं नये, स्वस्थ बसावें. उद्योग तर सतत केलाच पाहिजे. पण आपली जी स्थिति नाहीं

ती आहे अशी लोकांस वाटावी ह्मणून विनाकारण कर्ज काढून परिणामीं फजिती करून घ्यावी ह्यांत कोणचें शहाणपण ? आपला डामडौल यथास्थित चालावा ह्मणून लोकांची उचापत करायाची हा कोठचा सभ्यपणा! ह्मणजे अर्थात् आपल्या आद्यापेक्षां खर्च ज्यास्त ठेवला आणि तो भागण्यास पैसा नाहीं, मग करा काय? तर काढा कर्ज. कर्ज मिळत नाहीं, करा चोरी, चला तुरुंगांत! दुसरा उपाय नाहीं. अशा लोकांपेक्षां घरफोडे बरे नव्हेत काय? ह्या करितां प्रामाणिकपणानें वागून जी मीठ भाकर आपणांस मिळेल त्यांतच आनंदानें दिवस घालवावे हें बरें.

ह्या विवेचनावरून सर्वांनीं आंगास राख फांसून कौपीन धारण करून वायु सेवन करून रहावें असा अर्थ कोणी समजूं नये. साधारण वस्त्रप्रावर्णे स्वच्छ असणें, अन्नादि व्यवहार बेताबाताचा—ह्मणजे आपल्या सामर्थ्यानुरूप—ठेवणें इत्यादि आवश्यक गोष्टी तर केल्याच पाहिजेत. तेव्हां सांगायचें ह्मणून येवढेंच कीं, बेताबातानें आपल्या शक्तिप्रमाणें खर्च करून कोणाची एक पै काढण्याची गरज पडूं नये, असा मनाचा निश्चय करून वागल्यास, कर्जाची गोष्ट राहिली एकीकडेस पण, उलट दोन पैसै गांठीं राहतील ह्यांत संशय नाहीं.

ह्या जगांत सन्मित्र असे फार थोडे. ऐत खाउ फार. तुमच्याकडे खायाला प्यायाला यथास्थित मिळतें तोंपर्यंत पाहिजे तेवढे मित्र तुह्माला मिळतील. कारण शितें तोंवरीं भूतें हा सृष्टिनियम आहे. पण तेंच तुमचें एकदां उद्वर्तन झालें कीं, भराभर सर्व पळालेच ह्मणून समजा.

वर ह्मटलेले आद्यापेक्षां ज्यास्त खर्च करणारे बहुधः अशाच वर्गांतले लोक असतात. नाच, तमाशे, गाणें, बजावणें, हा सपाटा नेहमीं चाललेलाच असायचा. त्यांत पैसा खुंटला कीं धांव मारवाड्याच्या दुकानीं! असें होतां होतां कोणीच पैसा देतनासे होतात आणि काढलेल्या पैशाची फेड होत नाहीं कीं, लागले एका मागून एक 'टांच, 'केशे' यायला! ह्मण आहे—**अती तिथें माती.** कोणतीही गोष्ट फार झाली ह्मणजे तिचा परिणाम दुःखप्रद व्हावयाचाच.

**दुर्व्यसन**—दुर्व्यसनामुळें किती कुटुंबें दुःखसागरांत लोळत असतील बरें? मनुष्य एकदां कोणत्याही व्यसनाधीन झाला कीं, त्यास तें चालविण्याकरतां चोरी मारी, लांडी लबाडी, वगैरे अनेक दुष्ट मार्गांचें अवलंबन करावें लागतें; मग कर्ज काढावें लागेल ह्यांत नवल कोणतें? रंडीबाजी, दारूबाजी वगैरे दुर्व्यसनांच्यापार्शी किती कुटुंबें अन्नाला महाग झालीं असतील ह्याचा अंदाज आमचे वाचक सहज करूं शकतील. कारण व्यसनापासून होणारे अनिष्ट परिणाम सर्वांस विश्रुत आहेतच.

**जामिनगिरी**—कधींही कोणास जामिन राहूं नये. कारण तेणेंकरून आपण स्वतःचें कांहीं कारण नसतां निरर्थक दुसऱ्याचें ऋणाईत होऊन बसतों. समजा, एका गृहस्थास कांहीं रकम काढणें आहे पण ती त्यास मिळत नाहीं. आपल्या पतीवर त्यास रकम मिळते खरी, पण त्यास पुढें त्या रकमेची फेड करण्याचें सामर्थ्य नसलें तर, धनको जामिनदारास धरतो व त्यास पैसा भरून द्यावा लागतो. **धर्म करतां कर्म पाठीस**

लागतें ह्मणतात तें हें. दुसऱ्याची गरज पुरवावी ह्मणून त्याजवर जे उपकार करावे त्याची फेड अशा तऱ्हेनें होते ! ह्या जामिनगिरीच्यापायीं पुष्कळ लोक भिकेस मिळाले आहेत. संकटसमयीं दुसऱ्यास उपयोगी पडावें हा मनुष्यमात्राचा धर्म होय. पण ज्यास आपण जेवढ्या रकमेकरतां जामिन रहाणार त्यानें ती दिली नाहीं तर, दुसऱ्याचें कर्ज न काढतां व आपल्या कुटुंबपोषणाच्या कामीं हेळसांड न होतां, देतां येईल तर क्वचित् खऱ्या संकटांत असलेल्या मनुष्यास उपयोगी पडलें तर एक वेळ चालेल. तरी पण असे प्रसंग जेवढे टाळतां येतील तेवढे चांगले.

**जुगार वगैरे**—आळस, जुगार, सट्टे वगैरे कारणांनींही बहुत कुटुंबें अन्नान्न करीत राहतात असें वारंवार आपल्या पाहण्यांत येतें. तर हीं कारणेंही टाळण्याचा दृढ निश्चय केल्यानें बहुत जनसमूह खात्रीनें ऋणमुक्त होईल. जुगारामुळें किती अघोर कृत्यें जुगारी लोक करितात हें बहुधः सर्वांस माहित असेलच. धर्मराजासारखा सत्वशील, पापभीरू, अक्षविद्याविशारद आणि सत्यवचनी राजा असतांही त्याची जुगाराच्यापायीं काय दशा झाली हें आमच्या प्रिय वाचकांस पुराणादि ग्रंथांवरून अवगत असेलच. तेथें इतरांचा काय पाड ? उसनवार देणें ह्यानेंही फार नुकसान होतें. आज एकास १० रुपये उसने दिले, उद्यां दुसऱ्यास ५ दिले, ह्याप्रमाणें चाललें तर बहुधः दिलेली रकम परत येण्याचा संभव फार थोडा. आणि शेवटीं उसनावर देणारास **उर्ध्वाय दिशे ब्रह्मणे नमः** ह्मणण्याचा प्रसंग येईल !

**मुंबईंत** पावसाचे सट्टे चालतात. ह्या सट्याच्यापायीं शेंकडो लोक धुळीस मिळून गेले असतील. **असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरीं** असें ह्मणणारे लोक आमच्या ह्या देशांत थोडके का आहेत!

**संगतीपरिणाम**—इंग्रजींत एक ह्मण आहे कीं,

A man is known by the company he keeps

ह्मणजे मनुष्याची पारख त्याच्या संगतीवरून होते. हें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. चोराबरोबर जर आपण चाललों तर, आपणही चोर असूं असा लोकांचा सहज समज होतो. मनुष्य कितीही सुशील, पापभीरू, सत्याचरणी असला आणि त्यानें जर कां अशी दुष्टजनांची संगती सदोदित चालविली तर **संगती संगदोषेण** ह्याप्रमाणें:—

ढेंकणाच्या संगें हिरा तो भंगला।
कुसंगें नाडला साधु जैसा॥

असें होऊन जावयाचें. ह्यासाठीं मनुष्यानें संगती ठेवणें ती नेहमीं:—

सुसंगति सदां घडो सुजनवाक्य कानीं पडो

अशीच ठेविली पाहिजे असें कविवर्य मोरोपंत ह्मणतात. नाहीं तर व्यसनी, दारूबाज, भंगड, रंडीबाज अशा लोकांची संगती ठेविली ह्मणजे विपत्तीला काय उणें आहे? ती आपोआप चालून घरीं येते. दारूला पैसा

१:—विशेष माहितीसाठीं ग्रंथकाराचा मुंबईचा वृत्तांत पहा. लिहिण्यास फार आनंद वाटतो कीं, अलीकडे सरकारानें कायदा करून हे सट्टे बंद केले आहेत. हें सरकारानें फारच उत्तम कृत्य केलें ह्मणायचें.

नाहीं, काढ कर्ज. रंडीबाजीला पैसा नाहीं, काढ कर्ज. कर्जही कोठें मिळेनासें झालें ह्मणजे मग चौर्यकर्मादि अत्यंत नीच मार्गाचें अवलंबन करणें भाग पडतें, आणि शेवटीं बिनभाड्याची कोठडी शोधण्याचा प्रसंग येतो! कारितां बाप हो, दुष्ट संगती सोडा आणि **सद्भिरेव सहासीत सद्भिःकुर्वीत संगतिम्**, ह्मणजे सज्जनांचा सहवास करा आणि सज्जनांची संगती धरा, ह्मणजे तुह्मास विपत्ति कधींही स्पर्श करूं शकणार नाहीं, येवढेंच केवळ नव्हे तर, कर्जामुळेंही तुह्मीं नाडले जाणार नाहींत. आणि कर्ज नसल्यामुळें सुख आणि शांति ह्यांचा वास तुह्माकडे होईल. आणि तेणेंकरून तुह्मास सुख प्राप्त होईल हें येथें निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

**दागिन्यांचा शोक**—आपल्या शरीराला शोभविण्याकरतां दागिने घालणें ही चाल फार प्राचीन आहे. ही चाल आमच्याच देशांत आहे येवढेंच नाहीं तर, ती सर्वत्र पसरली आहे असें पाहण्यांत येतें. सुधारणेच्या अति उच्च शिखरास पोंचलेल्या यूरोपियन लोकांपासून तों **अफ्रिकेंतील** अति रानटी सिद्दी लोकांत देखील दागिने घालण्याचा सारखा शोक दृष्टीस पडतो! प्रत्येक राष्ट्राचे व प्रत्येक देशाचे दागिने निरनिराळ्या प्रकारचे असतात, ती गोष्ट वेगळी; पण, सर्वांस दागिन्यांचा सारखा शोक आहे ही गोष्ट खरी आहे. त्यांत पुरुषांपेक्षां स्त्रियांस आपल्या आंगावर दागिने घालून मिरविण्याची हौस फार असते हें बहुतेक राष्ट्राच्या इतिहासावरून दिसून येतें.

अलंकारादि भूषणें हीं शरीरशोभावर्धक आहेत ही गोष्ट खरी पण, दागिने घालणें ते बेताबातानें ज्याच्या त्याच्या सामर्थ्यानुरूप असले तर बरें. नाहीं तर उगीच आपल्या शक्तीपलीकडे दुसऱ्याचें कर्ज काढून लोकांत श्रीमंतीचा डौल मिरविणें ह्यांत लोकांस काय मोठेपणा वाटत असेल कोण जाणे! बरें, जो हा इतका पैसा दागिन्यांत घातला जातो त्यापासून कांहीं तरी उपयोग—देशाची गोष्ट राहिली एकीकडेस पण स्वःताला तरी—होतो काय? ह्याप्रमाणें कर्ज काढून केलेले दागिने आंगावर सदोदित तरी राहतात असें नाहीं. कारण मोठ्या हौसेनें लेण्याकरतां ह्मणून केलेले दागिने कांहीं दिवसांनीं मारवाड्याच्या पेटींत जाऊन पडतात! अशीं उदाहरणें आपण थोडीं का पाहतों?

दागिने असल्यापासून जवळ दोन पैसे राहतात असें सर्वांस वाटतें. गोष्ट खरी. पण ते चोरीस जाण्याचा किंवा हरवण्याचा किती संभव आहे बरें? एकदां एकादा दागिना गेला कीं, त्यांत घातलेला पैसा व्यर्थ नाहीं का गेला? आमच्या लोकांत दागिने घालण्याची चाल असल्यामुळें दागिन्याच्या रूपानें पैशाचा संचय करण्याची संवय लागते हें ह्मणणेंही कांहीं लटकें नव्हे. पण तितकें द्रव्य अनुत्पादक होऊन राहतें; ह्मणजे त्यापासून कोणास कांहीं फायदा होत नाहीं, हें आमच्या लोकांस—त्यांतून सुधारलेल्या सुशिक्षित लोकांस देखील—समजूं नये हें मोठेंच नवल! दागिन्याच्या रूपानें पैसा संग्रहीं राहून प्रसंग विशेषीं त्याचा कांहीं उपयोग होतो, हेंही कांहीं खोटें नव्हे. पण दागिन्यांस उपयोगांत आण-

ण्यासारखे प्रसंग सर्वांवरच का येतात ? शिवाय आंगावर दागिने असल्यापासून किती अनर्थ ओढवतात हें पुष्कळांना ठाऊक असेल. ह्या दागिन्याच्या हौसेमुळें किती अर्भकें व किती स्त्रिया प्राणास मुकल्या असतील नकळे ! नित्यशःअशीं उदाहरणें आपल्या पाहण्यांत येतात तरी आमच्या लोकांचे अजून डोळे उघडत नाहींत हें मोठेंच नवल ह्मणावयाचें !

सोनें, रुपें, मोत्यें, पोंवळीं वगैरेचें पाणी आंगावर पडलेंच पाहिजे, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे, असा आमच्या लोकांचा समज आहे. आमच्या मतें ह्याच समजामुळें विशेषें करून दागिने घालण्याची चाल प्रचारांत आली असावी. जेथें जेथें स्त्रीपुरुषांचें धर्म सांगितले आहेत, तेथें तेथें पुरुषांनीं स्त्रियांस वस्त्रालंकारांनीं भूषीत करावें असें सांगितलेलें वाचण्यांत येतें.

ह्यांतील मुख्य मुद्दा येवढाच असावा कीं, केवळ नैसर्गिक सौंदर्यानें मनुष्याची तृप्ति होत नसल्यामुळें कृत्रिम शोभा आणण्यास ही दागिने घालण्याची चाल पडली असावी. ठीक आहे. त्यांत कांहीं वावगें नाहीं. कसेंही असलें तरी आमच्या लोकांस दागिने घालण्याचा शोक इतर लोकांपेक्षां विशेष आहे ही गोष्ट निर्विवाद होय.

ह्या सर्व विवेचनावरून वाचकांचा असा समज होण्याचा संभव आहे कीं, जें काय खुडुक मुडुक कोणापाशीं असेल तें सर्व विकून टाकून त्यांच्या स्त्रियांनीं सळसळीत पार्वती बनून रहावें ? पण आमच्या म्हणण्याचा रोख मुळींच तसा नाहीं. **एक नूर अदमी, दस नूर कपडा, और सौ नूर गहिना** हें आह्मीं जाणत

आहों ; येवढेंच नाहीं तर, आपल्या ऐपतीप्रमाणें दागदागिने किंवा कपडा लत्ता ल्याल्यानें मनुष्याच्या नैसर्गिक सौंदर्यास कांहींशी मदत होते व तें विशेष सुंदर दिसतें हेंही पण आह्मी कबूल करतों. तर ह्या सर्व विवेचनावरून आमचा इतकाच हेतु समजला पाहिजे कीं, ज्यानें त्यानें आपापल्या ऐपतीप्रमाणें—पण विनाकारण अवजड व आवड धोबड अशा दागिन्यांत द्रव्य न घालतां दागिने करून त्यांत बेताबाताचा पैसा म्हणजे दुसऱ्याची उचापत करून आपल्या डोईवर कर्जाचा बोजा करून न घेतां, करण्यासारखे असतील ते खुशाल करावे. व राहिलेला पैसा एकाद्या उत्पादक कामाकडे लावावा. जितका पैसा दागिन्यांत जातो तितकाच एकाद्या व्यापारांत घातला असतां त्यापासून किती फायदा होतो ह्याचें विवेचन पुढें करूं.

जशी दागिन्यांची तशीच उंचीं उंचीं वस्त्रें वापरण्याची आमच्या लोकांस फार हौस आहे. वर ह्मटल्या प्रमाणें ह्या बाबतींतही सर्वांनीं **वल्कल वेष्टित रुद्राक्षधर** व्हावें असें आह्मी ह्मणत नाहीं. शरीररक्षणास ज्याची नेहमीं अवश्य गरज लागते असा कपडालत्ता मनुष्याला पाहिजेच पाहिजे. चांगला उत्तम भरजरी शालू आहे आणि आपणापाशीं तो घेण्याचें सामर्थ्य नाहीं किंवा त्याची आपणांस गरज नाहीं तर, मारवाड्याचे पैसे काढून दोन दिवसांनीं तो पुनः त्याच्या दुकानांत नेऊन टाकावा, असल्या शोकाला काय ह्मणावें? अशा तऱ्हेनें वागणाऱ्या लोकांची संख्या आमच्या लोकांत कांहीं कमी आहे असें नाहीं. तर हे मद्देशबांधव हो, ज्या पासून

दुसऱ्याचें देणें आपणांस होईल अशा सर्व मार्गांचा त्याग करा आणि संसाराचें हित करून घ्या, हाच येवढ्या आमच्या सांगण्याचा इत्यर्थ आहे.

आतां वर ह्मटल्याप्रमाणें व्यापारांत पैसा घातला असतां त्यापासून कसा फायदा होतो ह्याचें एक उदाहरण देऊन आह्मी काय ह्मणतों त्याची वाचकांस समजूत घालून देऊं.

समजा, एक इसम आपल्या जवळ असलेले शंभर रुपये पोस्टाच्या सेव्हिंग्स ब्यांकेंत नेऊन भरतो. आतां हें खरें आहे कीं, तेथें त्यास व्याजाचा दर फार हलका मिळतो; ह्मणजे शेंकडा ३¾ रुपये मिळतात, पण तेवढ्यास तर कांहीं भीति नाहीं. ह्यांत दुसरा आणखीं एक फायदा आहे तो हा कीं, त्यास पाहिजे तेव्हां सव्याज ती रकम उचलतां येते. हेच शंभर रुपये त्यानें दागिन्यांत घातले असते तर त्यापासून त्याला शंभरच्या शंभर रुपये मिळते काय? शिवाय दागिना करण्याकरतां सोनाराला दिलेली मजूरी गेली ती गेलीच! हेंच ह्मणणें आपण उदाहरणानें व्यक्त करूं.

समजा, शंभर रुपयाचें सोनें आणून तें दागिना करण्याकरतां एका इसमानें सोनारास दिलें. महिना दोन महिने ह्मणजे तो दागिना तयार होई तोंपर्यंत रकमेचें व्याज नाहीं तें नाहींच. पण तो दागिना घरीं आणून ८—४ दिवसांतच कदाचित् चोरीस गेला कीं कोठें हरवला तर, हातीं धुपाटणें आल्यासारखी नव्हे का ही गोष्ट? बरें, तो दागिना हरवला नाहीं कीं चोरीसही गेला नाहीं, त्याच्याच पाशीं आहे असें समजा; पण

कांहीं दिवसांनीं त्यास शंभर रुपयांची जरूर लागली आणि त्या दागिन्यावर पैसा काढावयास गेला तर, त्यास शंभरच्या शंभर रुपये मिळतील काय? नाहीं हें खचीत. पण मिळतील असें घटकाभर ह्मटलें तरी, टक्क्याच्या मितीनें रुपये मिळाले तर वर्षाकाठीं बारा रुपये व्याजापोटीं भरावे लागतात, हें उघड झालें. आठ आण्याच्या मितीनें ह्मटलें तरी सहा रुपये जातात.

अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. सांगायचें ह्मणून येवढेंच कीं, अगदीं आवश्यक तेवढ्या दागिन्यांत जो पैसा जातो तो वजा जातां अशा अनुत्पादक द्रव्यांत जो आमच्या लोकांचा विनाकारण अतोनात पैसा जात आहे तो न जाऊं देतां, व्यापारादिकांत घातला तर त्यापासून देशाचें केवढें हित होईल, किती कुटुंबें सुखानें नांदतील, व केवढ्यांना नादार कोर्टाची पायरी चढण्याची पाळी येणार नाहीं बरें? ह्या सगळ्या गोष्टी राहिल्या बाजूस पण, अशा तऱ्हेनें ज्याचा पैसा वांचेल त्यास किती फायदा होईल बरें? अर्थात् तो ह्या सर्व यातायाती पासून मुक्त होऊन कांहीं अंशीं तरी सुखी होईल ह्यांत संशय नाहीं. ह्यासाठीं आपल्या जवळ पैसा नसला तर आपला डामडौल चालण्याकरितां दुसऱ्यापासून कर्ज काढून तें वारण्याचें सामर्थ्य नाहीं ह्मणून जगांत आपलें हँसें करून घेऊं नये हें उत्तम. फार झालें तर लोक आपणांस गरीब ह्मणतील येवढेंच काय तें. ह्मणतना बापडे! पण प्रसंग विशेषीं तुरुंगांत जातेवेळीं पैसा देऊन आपली मुक्तता करण्यास कोणी येईल काय?

**लग्नादि कार्यांत होणारा उधळा खर्च**—हा विषय इतका व्यापक आहे कीं, त्याच्यावर एक स्वतंत्र निबंध लिहितां येईल. आपण फक्त लग्नांत खर्चांच्या मुख्य मुख्य बाबी कोणत्या आहेत हें पाहूं. आमच्यांत मुलाचें लग्न असलें कीं, वधुपक्षाकडून आधीं हुंड्याच्या रकमेची इयत्ता ठरल्यावांचून संबंधच जुळावयाचा नाहीं. ज्या ज्या जातींत ही हुंडा घेण्याची दुष्ट चाल आहे, त्या त्या जातींच्या लोकांस ह्या बाबतींत किती संकटें भोगावीं लागत आहेत हें येथें व्यक्त करून सांगण्याची कांहीं आवश्यकयता नाहीं. हीं संकटें ज्यांच्या ज्यांच्यावर ह्मणून आलीं आहेत, त्यांस त्यांचा चांगला अनुभव असेलच. ज्यास लग्नाकरतां कांहीं कर्ज काढल्यावाचून हुंडा देण्याचें सामर्थ्य असेल त्यानें तो खुशाल द्यावा. पण सामर्थ्य नसतां कर्ज काढून आपणास संकटांत पाडून घ्यावें अशी कोण इच्छा करील? पण **गरजवंतकु अक्कल नहीं** ह्या ह्मणीप्रमाणें अडल्यावर काय करतात? समजा कीं, एका गृहस्थास दोन मुली आहेत. त्यांचें लग्न कर्तव्य आहे. त्यास दरमहाचें उत्पन्न पन्नास रुपये आहे. घरीं कुटुंबास सात आठ माणसें खाणारीं आहेत. तो राहतो मुंबई सारख्या शहरीं. तेव्हां त्यास आपल्या नांवाप्रमाणें प्रत्येक लग्नांत निदान ५०० रुपये तरी खर्च येणार. दोन लग्नें मिळून अर्थात् एक हजाराचा तोडा उठला. कुटुंबवत्सल असल्यामुळें त्याच्यापाशीं माया पुंजी कांहीं नाहीं. तर त्यानें ही येवढी रक्कम आणावी कोठून? कोठून ह्मणजे! आज **मुंबईतले** सर्वच का मारवाडी मेले? हात्तिच्या! त्यांत

काय आहे? पैशाची फेड झाली नाहीं ह्मणून काय झालें? नादार कोर्ट तर कोठें गेलें नाहीं ना? करा, ‘शिडूल फाईल’ द्या मारवाड्याच्या हातीं ‘इंटरीम आर्डर;’ आणि सूर्योपस्थान करून व्हा मोकळे. कीं झालें सर्व काम. बरें, त्यानें असें करूं नये तर काय करावें? व्याही ह्मणतात काय हो त्याला काय झालें? दरमहा ५० रुपये कमावतो आहे, तेंव्हां दोनशें रुपये तरी निदान हुंडा दिल्या शिवाय कोण करतो आहे त्याची मुली? आमचें थोडेंच अडलें आहे, आमच्या मुलाला मुलीचा तोटा का आहे? असाच दुसरा व्याही म्हणणार. मुली तर अविवाहिता ठेवितां येत नाहींत. तेंव्हां अर्थात् वरपक्षाकडील लोकांच्या सर्व अटी निमूटपणें कबूल कराव्या लागतात. एकादा मनुष्य पापभीरू आहे आणि त्यास जर वर म्हटलेल्या ‘सूर्योपस्थान’ करण्याच्या निंद्य प्रकाराचें अवलंबन करणें आवडत नाहीं तर, त्यानें कर्जाची भरपाय करतां करतां आमरणान्त कर्जांत बुडून रहावें दुसरें काय? आह्मी हें दोन मुलींचेंच उदाहरण दिलें, पण ज्या बिचाऱ्यास पांच चार मुली आहेत आणि हुंडा घेतल्यावांचून तर कोणी मुली करीत नाहीं तर त्यानें काय करावें? श्रीमंत आहेत त्यांची गोष्ट वेगळी पण, गरीब किंवा मध्यमस्थितींतील मनुष्यांस घरावर (तें असलेंच तर) तुळशीपत्र ठेवण्याचा प्रसंग आल्यावाचून राहील काय? अशा प्रसंगीं कर्ज टाळण्याचा आह्मांस एकच मार्ग सुचतो. तो हाच कीं, ज्याला फार मुली असून हुंडा देण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यानें चागले सुशील गरीबाचे मुलगे पाहून त्यांस मुली देऊन टाकाव्या.

ह्यांत स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही कामें होतात. मुलीचा बापही कर्जबाजारी होत नाहीं आणि गरीबांच्या मुलांस मुली मिळतात. पण असें ‘ असिव्रत ’ आचरण करणारे आमच्यांत आहेत कोठें ? असीं माणसें मिळतील तर आणखीं दोन मोठे फायदे होतील. एक—हुंडा मागणारांची संख्या कमी होऊन हुंड्याची इयत्ताही कमी होईल. व दुसरा—गरीब लोक कर्जानें फार नाडले जाणार नाहींत. म्हणजे अर्थात् आपला संसार सुखासमाधानें करतील. ह्या पेक्षां दुसरा कोणता फायदा असणार ?

कन्येबद्दल पैसा घेण्याचीही अति निंद्य व अघोर चाल कांहीं जातींत आहे ! मग जवळ पैसा असो अथवा नसो. पण ज्यास आपले दोहोंचे चार हात करून घेण्याची इच्छा असेल त्यानें काबाडकष्ट करून आजपर्यंत मिळविलेला सर्व पैका मुलीच्या बापास—नसल्यास पालकास—अर्पण करून आपल्या हाडांस हळद लावून घ्यावी आणि बसावें सारा जन्म कर्ज भरींत !

भोजन खर्च, मुलीला दागदागिने, कपडा लत्ता, वरमायेची समजूत, नारळांचा खर्च, ब्यॉंड, नायकीण, वगैरे अनेक बाबतींत निरर्थक खर्च विवाहोत्सवांत उभयपक्षीं करावे लागतात. त्या प्रत्येकाविषयीं येथें लिहिण्याची तादृश आवश्यकता नाहीं. सूज्ञ वाचक वरील दोन उदाहरणांवरून सर्व समजून घेतील.

श्रीमंत आहेत त्यांनीं पाहिजे तर करावा हवा तसा खर्च. पण कित्येक गरीब लोकही आंवट शोकी बनतात आणि श्रीमंतांचें अनुकरण करून उगाच ऋण-

रूपी बिडी आपल्या हातीं आपल्या पायांत घालून घेतात, हें मात्र वाईट.

वस्तुतः पाहिलें तर आमच्यांतील सर्वच लोक उधळपट्टी करणारे असतात असें ह्मणतां येत नाहीं. पण करतात काय बिचारे? आमच्या चालीरीतींनीं आह्मांला इतकें जखडून टाकलें आहे कीं, हात पाय हालवण्याला सुद्धां अवकाश नाहीं. तरी होतां होईल तें करून शनैः शनैः हीं बंधनें शिथिल करण्याचा प्रयत्न करून आपणांवर ह्या बाबतींत कर्ज होऊं देऊं नये असें प्रत्येकानें केलें कीं पुरे आहे.

**और्ध्वदेहिक कार्यांत होणारा खर्च**—विवाहसंबंधीं खर्चाच्या खालोखाल, किंबहुना विवाहांत होणाऱ्या खर्चाबरोबर मृतक संबंधीं कार्यांत आमच्या लोकांत खर्च होतो. मनुष्य मेल्या दिवसापासून तों एक संवत्सर पर्यंत भोजनें, दानें, दक्षिणा या खालीं आमच्या लोकांचा किती पैसा जात असेल कोण जाणें? अलबत् धर्मशास्त्राप्रमाणें अवश्य तो खर्च करणें योग्य होय. पण शक्तीपलीकडे जाऊन कर्जाखालीं मरून जावें आणि असले खर्च करावे हें चांगलें नाहीं.

**अपात्रींदान**—अपात्रींदान करणें हेंही एक आमच्या दारिद्र्याचें कारण आहे. आज नाहीं ह्मटलें तरी आमच्या देशांत बारा तेरा लाख भिक्षेकऱ्यांची संख्या निघेल. एवढ्या लोकांचा उदरनिर्वाह करण्याचें काम आमच्या लोकांवर पडतें हें उघड आहे. तेव्हां ह्या तेरा लाख माणसांना कांहीं कष्ट केल्यावांचून आपला चरितार्थ चालवितां येतो. ह्या तेरा लाख भिक्षेकऱ्यांतून दयापात्र

अशीं माणसें फार झालें तर दोन तीन लाख निघतील. बाकीचे १० लाख लोक आपला वेळ फक्त आळसांत घालवितात; व आधींच कर्जानें बुडून गेलेल्या आमच्या लोकांस अधिक कर्जांत बुडविण्यास ते अंशतः तरी कारणीभूत होतात हें सर्वांच्या सहज लक्षांत येईल.

आमच्या लोकांत कर्ज होण्याला आमच्या रीती भाती, आमचे धर्म संबंधीं समज व आमचें अर्थशास्त्राचें अज्ञान वगैरे अनेक कारणें आहेत; पण त्या सर्वांबद्दल लिहून उगाच लेख वाढविण्यांत कांहीं हांशील नाहीं. वर जेवढा मुख्य मुख्य गोष्टींचा संक्षेपानें उल्लेख केला आहे तेवढ्यावरून वाचकांची खात्री झालीच असेल कीं, हीं सर्व कारणें—त्यांचा प्रतिकार न केल्यामुळें—मनुष्यांस कर्जांत बुडविणारीं आहेत. तरी क्रमशः होण्यासारखा असेल तेथें—हस्तें ह्मणा परहस्तें ह्मणा—कसेंही करून अशा अनर्थावह खर्चाचा ओघ सद्व्ययाकडे वळेल असें सर्वांनीं करण्याचा दृढनिश्चय केल्यानें कालेंकरून तरी आमचे लोक ऋणमुक्त होत्साते संसारसुखाचा यथाप्राप्त लाभ करून घेतील अशी आशा आहे.

## कर्जापासून होणारे अनिष्ट परिणाम.

**द्रव्यनाश**—इ० स० १८८१ सालच्या मनुष्य गणतीवरून असे आंकडे मिळतात कीं, त्या वर्षीं सर्व **हिंदुस्थानांत** २ लक्ष २१ हजार लोक धनकोचा धंदा करणारे होते. शोधकांच्या पाहण्यांत असें आलें आहे कीं, **हिंदुस्थानांत** व्याजाचा दर मनस्वी फाजील आहे. रकमेला कांहीं तारण असलें तर दरसाल दरशेंकडा

३७½ रुपये प्रमाणें व्याज घेण्यांत येतें. एरव्हीं रुपयास आणा घेतात. ह्मणजे अर्थात् दर साल दर शेंकडा ७५ रुपये झाले! इतकें जबर व्याज घेण्यांत येतें! कर्जापासून द्रव्याचा नाश कसा होतो तें पहाः—एका मनुष्यास ५० रुपयाचें कर्ज आहे ह्मणून समजा. त्यास व्याजापोटीं दरमहा ३ रुपये २ आणे सावकारास द्यावे लागतात. ह्याप्रमाणें तीन वर्षांत बापड्यानें शंभराहून अधिक रुपये निव्वळ व्याजापोटीं भरले तरी ५० रुपयाचें मुद्दल कायम आहे तें आहेच! हा काय थोडा तोटा झाला!!

मागें एका प्रसंगीं ह्मटलें आहे कीं, मनूनें कोणापासून कसें व किती व्याज घ्यावें ह्या बाबतींत नियम घालून दिले आहेत. आतां त्यांतून कांहीं नियम फार कडक आहेत व ते आज बहुधः पसंत पडणार नाहींत हें खरें आहे पण, लिहिण्यास फार दिलगीर वाटते कीं, आमच्या इंग्रज सरकारच्या राज्यांत व्याजासंबंधीं तसले कांहीं नियम नसल्यामुळें पुष्कळ गरीब लोक अन्नान्न करून मरत आहेत.

**अब्रूची नाचक्की**—कर्जदार मनुष्याची जी नाचक्की व बेअब्रू होते त्याचें किंचीत् वर्णन केलें असतां वाचकांची खात्री होईल कीं, कर्ज काढणें हें अत्यंत नीच कर्म होय. पहा बरें—जो मनुष्य ऋणमुक्त आहे त्यास कोणाची भीति असते काय? पण तीच कर्जबाजाऱ्याची स्थिति पहा—कर्ज काढतांना त्यांस कांहीं वाटत नाहीं. तो ह्मणतो—'त्यांत काय आहे? येवढीच रकम ना! हां हां ह्मणतां भरून टाकूं' पण **आगमे सुखसंप्राप्ति-**

**निर्गमे प्राणसंकटम्**! ह्याप्रमाणें कर्ज भरतां भरतां प्राणान्त होऊन जातो! एक तर कर्ज काढल्यादिवसापासून व्याज सुरू होतें. त्यांत मुंबईमध्यें मारवाडी लोक लिहून घेतात शंभर रुपयांचा रोखा, पण हातीं देतात अवघे ७५ रुपये; ह्मणजे २५ रुपये व्याजापोटीं आधीं कापून घेतात ते घेतात, आणखी पुनः शंभर रुपयाचें व्याज चालू आहेच! मुंबईमध्यें असेही कित्येक 'खुशालचंदू' आहेत कीं, कोऱ्या करकरीत कागदावर खुशाल सही करून रुपये घेऊन चालते होतात. मग मारवाडीच ते. पाहिजे तो आंकडा टाकून हवें तें व्याज लिहितात व हवी ती मिती लावितात. कित्येक नुसता रकमेचा आंकडा मात्र घालून सही करतात. व्याज, मिति मारवाड्यास लागेल ती त्यानें खुशाल घालावी! बरें, येवढ्यावरच संपतें काय? कधीं कधीं तर लिहिल्या आंकड्यावर एकादें शून्य चढविण्यास किंवा एखादा आंकडा रकमेच्या मागें ढकलावयासमुद्धां मारवाडी लोक चुकत नाहीं! रोख्यांतील मुदत सरली कीं, व्याज चक्रवाढरीतीनें आकारतात. याप्रमाणें काहीं दिवस चालतें. पण पुढें फेडण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें कीं, लागले मारवाडी दारापुढें हेलपाटे घालायला. मग बिचारा काय करतो! एकास मोस्तराचा वायदा, दुसऱ्यास 'घरांत नाहीं, उद्यां ये,' तिसऱ्यास 'चार दिवसांनीं खचीत देतों,' चौथ्यास मुदत पुरी झाली ह्मणून दे दुसरा नवा रोखा लिहून. ह्याप्रमाणें कांहीं दिवस चालायचें. पण जेव्हां बिचारे हेलपाटे घाल घालून थकून जातात तेव्हां त्यांस स्मालकाज कोर्टाचा

मार्गें लक्षीत जाणें भाग पडतें. तेथें 'डिक्री' होते. मग हप्तेबंदीनें रुपये द्यावे लागतात. हे हप्तेही बरोबर वेळच्या वेळीं पोंचत नाहींत असें झालें कीं, टांच काढून घरांत जें कांहीं मिळेल तें सर्व जप्त करून मारवाडी घेऊन जातो. ह्या 'टांच' लावण्याच्या वेळच्या देखा-ण्याचें वर्णन करण्यास खरोखरी एकाद्या उत्तम कवी-चीच योजना केली तर कोठें त्यास कांहींसें ह्या देखा-व्याचें चित्र काढतां आलें तर येईल! ते दहा पांच मार-वाडी जमले आहेत; तो बेलीफ मालाची यादी करीत आहे; तो शेजार पाजारचे लोकांचा व पोरांबाळांचा गम्मत पाहण्यास जमलेला थव्याचा थवा; तो घरांतील मनुष्यांचा किंवा त्याच्या सोयऱ्या संबंध्यांचा 'अरे तें माझें भांडें, तो माझा पाट, ती माझी परात' ह्मणण्याचा सपाटा व याद लिहितां लिहितां तितक्यांतले तितक्यांत 'मला कांहीं ठाऊक नाहीं कोर्टाच्या हुकमाप्रमाणें हें सर्व सामान मी घेऊन जाणार. तुमचें असेल तर तुह्मी कोर्टास अर्ज करून आपलें सामान सोडवून आणा' वगैरे बेलिफाचें त्यांस उत्तर; त्यांतल्यात्यांत घरांतील बायका पोरांची बेलिफाच्या हातीं कांहीं लागूं नये ह्मणून सांपडेल तें लांबविण्याची धांदल; ह्या सर्व गोष्टींचें यथार्थ चित्र काढणें आमच्या लेखणीच्या शक्ती-पलीकडे आहे. अस्तु. याप्रमाणें फक्त स्वयंपाकास लागणारीं अवश्य अशीं दोन चार भांडीं खेरीजकरून घरांतील चटूसारें सामान मारवाडी घेऊन जातो. बरें, येवढ्यानेंही त्याच्या रकमेची भरपाय झाली नाहीं कीं, तो लागलाच 'केशा' काढून ऋणकोस तुरुंगांत नेऊन

टाकतो! हर हर! काय ही स्तिति!!! आमच्या तर आंगावर रोमांच उभे राहतात! मग ज्याच्यावर ह्या स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची पाळी येते त्याच्या मनाची स्थिति काय होत असेल ती त्या एका जगदीशासच ठाऊक! ह्याप्रमाणें मनुष्याची स्थिति झाली ह्मणजे मग त्यास कोठेंही फारसा मान मिळत नाहीं. त्यानें कोणापाशीं चार पैसे मागितले तर ते त्यास देण्यास लोक धजत नाहीं. सोयरे धायरे, इष्टमित्र ह्यांत त्याची पत मुळींच राहत नाहीं. अशी सर्वतोपरी बेअब्रू होऊन त्यास कोणास तोंडहीं दाखविण्यास मोठी लाज वाटते.

**खोटें बोलण्याची संवय**—आकस्मिककारणामुळें—कीं ज्यांचा मागें एकदां उल्लेख झाला आहे—ज्या मनुष्यास कर्ज काढावें लागतें अशांस किंवा ज्यास तें देण्याचें सामर्थ्य आहे अशा मनुष्यास देखील ह्या कर्जाच्या बाबतींत खोटें बोलण्याचा प्रसंग येतो, मग ज्यानें नेहमीं कर्ज काढण्याचाच धंदा पत्करिला आहे किंवा फेडण्याचें सामर्थ्य नसतांही कर्ज काढीतच जातो, अशा मनुष्यास खोटें बोलण्याची संवय लागेल ह्यांत कोणतें नवल! एक सावकार दारीं आला कीं, जा दुसऱ्याचे दुकानीं, दे त्याला कांहीं तरी भुलथाप कीं, आण पैसे, दे ह्याला. अशा असंख्य लबाड्या कर्जबाजाऱ्यास नित्यक्षः कराव्या लागतात. मग त्याच्या पुढें '**धर्म चर. सत्य वद. नानृतात् पातकं परम्**' वगैरे शास्त्राज्ञा लटपटतात! लहान मुलें हजार हिश्यांनीं सत्यवादी असतात. पण कधीं कधीं अशी गम्मत

पाहण्यांत येते कीं, कांहीं तरी खोटें सांगून मारवाड्यास वाटेस लावून दिलें आहे नाहीं तोंच घरांतून पोर येतें आणि बापास ह्मणतें—'कांहो बाबा, तुह्मी घरांत असतांना त्याला आईनें 'बाबा घरांत नाहींत' ह्मणून सांगितलें हें कसें'? बाप ह्मणतो—'हा वेड्या. हें नाहीं का तुला समजत? तो आपल्याकडून पैसे मागतो ह्मणून' तेवढें सांगून तरी पुरे करतो काय? नाहीं. तर त्यास आणखी लबाडी बोलण्यास शिकवितो—'पहा बरें बाळ! आतां कोणीही आला कीं त्यास बाबा घरांत नाहींत ह्मणून सांगावें किंवा, अशी कांहीं तरी सबब सांगून त्यास वाटेस लावून द्यावें.'

**वंशपरंपरेचे ऋणाईत**—मागील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, एक वेळ ब्रह्मघ्नही पापापासून मुक्त होऊं शकेल; पण ऋणाईत कधींही ऋणमुक्त व्हायचा नाहीं. ऋण त्याच्या पिढ्यान् पिढ्या पाठीशीं लागलें आहेच! आमच्या मतें शास्त्रकारांचा रोंख इतकाच दिसतो कीं, मनुष्यास अशी भीति घातली तरच तो कांहीं वचकला तर वचकेल आणि ऋण न करण्याविषयीं सावध राहील. ह्याच्या पलीकडे त्यांचा कांहीं विशेष मतलब असेलसें आह्मांस वाटत नाहीं. आमच्या शास्त्रकारांचा शास्त्रार्थ लिहिण्याचा मूळ उद्देश असतो एक, पण कालांतरानें त्याच्या अर्थाचा अनर्थ करून रूढी बलवत्तर होऊन जाते आणि शेवटीं ज्यास पाहिजे त्यानें पाहिजे तसें वागावें असें होऊन जातें. ही आमच्या धर्मशास्त्राची स्थिति! आमची स्थिति आज सर्वच बाबतींत विपरीत झाली आहे.

मग ही बाबत तर ज्याच्या त्याच्या स्वार्थाची. तेव्हां त्यांत ढकलतां येईल तेथें आपलें घोडें ढकलण्यास कोण कमी करील! हाच स्वार्थ ही वंशपरंपरेनें कर्ज घेण्याची वहिवाट पडण्यास कारण झाला असावा. आजमितीला किती लोक त्यांच्या वडिलांनीं काढलेलें कर्ज फेडीत असतील नकळे! एकदां कोठें सावकरानें लग्नाकरतां पांच पन्नास रुपये दिले असतील, तेवढ्याकरतां बापड्यानें सारा जन्म सावकाराकडे गुलामगिरींत घालवावाना? येवढ्यानें तरी कर्जाची फेड कोठें होते? त्याच्या पश्चात् देखील तें कर्ज त्यास सुटत नाहीं. तर, त्याच्या मुला-बाळांनींसुद्धां धनकोकडे आपलें जीवित विकून त्याच्या स्वाधीन राहवें लागतें. किती अघोर व दुष्ट ही स्वार्थ-परायणता! वस्तुतः 'ज्यानें करावें त्यानें भरावें' हें रास्त, पण बापानें काढावें कर्ज आणि तें फेडावें मुलानें! ह्याच न्यायतत्वावर गुलामगिरी माजली असावी. पण ते अडाणी समजूतीचे दिवस आतां गेले. आतां ज्ञानबळें-करून बहुतेक लोक सुधारले आहेत व क्रमशः सुधरत चालले आहेत. तेव्हां असल्या वेडगळ समजुती जेवढ्या नष्ट होतील तेवढ्या चांगल्या. तेवढ्या अशा गरीब नाडलेल्या लोकांस उन्नतीप्रत नेण्यास कारणीभूत होतील ह्यांत लवमात्र संदेह नाहीं. विद्वानांनीं ह्या बाबतींत अवश्य लक्ष लावून होतां होईल तें करून ही दुष्ट चाल हळुहळू कां होईना पण बंद करण्याच्या यत्नास लागावें.

**कुटुंबविपत्ति**—ऋणाईताचें कुटुंब सदा सर्वकाळ विपत्तींत बुडून गेलेलें असतें. कारण उघड आहे. त्यास त्यांचें पालन पोषण करण्याचें सामर्थ्य नसतें. ऋणाईतास

काळजीनें ग्रासून टाकलें असतें तेणेंकरून कोणत्याही बाबतींत त्यास उत्साह ह्मणून राहत नसतो. दुसऱ्या सर्व गोष्टी राहिल्या एकीकडेस, पण तोंडाशीं हात कसा जातो? अशी निरंतर विवंचना लागलेली असते. याप्रमाणें घरधनी विद्यमान आहे तोंपर्यंत रडत पडत कसें तरीं चालतें. पण दुर्दैवेंकरून जर कां त्याजवर मृत्यूनें धाड घातली तर त्या कुटुंबांतील मनुष्यांच्या विपत्तीला पारावार नाहींसा होऊन जातो.

**मानसिक तोटे**—लबाडी करणें, दुसऱ्यास फसविणें, खोटी साक्ष देणें, चोरी करणें, रंडीबाजी करणें, दारू पिणें, वगैरे नानाप्रकारच्या खोडी कर्जबाजाऱ्यास लागतात. इतक्या दुष्ट संवई मनुष्यास लागल्या ह्मणजे त्याच्या मानासिक वृत्तींतही फेरफार होतील यांत नवल नाहीं. मग मी आलों कोठून, मला जायचें कोठें, माझा माझ्या देशाशीं, मातापितरांशीं, पत्नीशीं, मुलांबाळांशीं इष्टमित्राशीं, सुहृत् संबंध्यांशीं कसकसा संबंध आहे आणि सर्वांहून अधिक मला ज्या प्रभूनें जन्मास घातलें त्याच्याशीं मला कसें वागलें पाहिजे, इत्यादि प्रगल्भ विचार त्याच्या मनांत कोठून येतील! खरें आहे. त्याचें मन सदोदित उद्यां आपणांस पैसा पाहिजे तो कोणत्या युक्तीनें व कोणाला फसवून काढावा, सावकार मागण्यास आला तर त्यास काय सांगावें, वगैरे नानातऱ्हेच्या घातुक विचारांत गढून गेलेलें असतें, असत्य बोलणें ह्मणजे कांहींच नाहीं असें त्यास वाटतें. सारांश, एका कर्ज काढण्याच्या योगानें मनुष्याची शारिरीक संपत्ति बिघडते ती बिघडतेच, पण मानसिकवृत्तीही दुष्ट होते हें उघड आहे.

## कर्जांतून मोकळें कसें व्हावें ?

कर्जबाजारी मनुष्य 'काय करावें बुवा ! मला कांहीं सुचत नाहीं. मी फार संकटांत पडलों,' ह्याप्रमाणें एक दिवस नाहीं, शंभर वर्षेपर्यंत स्मरणी घेऊन जप करीत बसला तरी त्याची कर्जांतून मुक्तता ह्मणून कधींच व्हावयाची नाहीं. तर त्यानें आपल्या मूर्खपणामुळें जें झालें तें झालें, पण आतां त्यांतून मोकळे कोणत्या उपायानें होऊं या गोष्टीचा शोध केला पाहिजे. यासाठीं आह्मीं आमच्या वाचकांकरतां ऋणमुक्त होण्याचे मुख्य मुख्य उपाय खालीं दाखविले आहेत. त्यांकडे सर्वांनीं लक्ष्य लावून त्याप्रमाणें चालण्याचाही प्रयत्न करावा अशी आमची त्यांस विनंति आहे.

**कर्ज व उत्पन्न ह्यांचा हिशेब.**—ज्याला नोकरी आहे, दरमहा बांधलेला पगार येतो, त्याला आपलें उत्पन्न काय आहे, हें पक्कें समजतें पण, इतर धंदेवाले लोक कीं, ज्यांचें उत्पन्न नेहमीं अनियमित असतें अशा लोकांनीं निरंतर साधारण मानानें आपलें उत्पन्न कमीच धरावें हें बरें. ह्मणजे अर्थात् ज्या योगानें कर्ज वारून आपल्या कुटुंबाचें पोषणही करतां येईल असेंच वर्तन ठेवावें.

ज्यांचें उत्पन्न अनिश्चित असतें असे कित्येक लोक मोठी चूक करतात ती ही कीं, 'याच्याकडून माझे अमुक रुपये यायचे आहेत, त्याच्याकडून तमुक यायचे आहेत, मग मोकळ्या हातानें खर्च करण्यास काय चिंता आहे?' अशा आशेवर राहून डामडौलांत, ख्यालीखुशालींत व

खाण्यापिण्यांत, कांहीं एक नियम न राखतां बेफाम खर्च करतात. पण शेवटीं गम्मत काय होते कीं, आशेचा भंग होऊन जातो आणि सदर्हूप्रमाणें सुरू केलेले ढंग यथास्थित चालावे ह्मणून काढलेलें कर्ज तसेंच्या तसेंच राहतें, यवढेंच नव्हे तर, तें दिवसें दिवस अधिकाधिक वाढत जातें. यासाठीं प्रथमतः ज्यानें त्यानें आपलें उत्पन्न चांगलें तपासावें व त्याप्रमाणें खर्चाचें मान ठेवावें. तसेंच आपणास लोकांचें देणें किती आहे, ह्याचाही चांगला अंदाज करावा. ह्या अवश्य गोष्टीकडे दुर्लक्ष्य करणें हें चांगलें नव्हे. गरज लागली ह्मणजे ह्याचे दोन काढ, त्याचे चार काढ असा उच्छृंखळपणा ठेवला कीं, मग मात्र घडगत नाहीं, कारण मला एकंदर देणें किती आहे व तें कशा रितीनें खर्च केला असतां नियमित वेळांत वारून ऋणमुक्त होतां येईल याची जर व्यवस्था न ठेवली तर कर्जाची फेड कशी व्हावी? तसेंच ज्यांना दहा पाचांचें देणें आहे त्यांनींही पण अवश्य विचार केला पाहिजे कीं, कर्जासाठीं आपणास निकड कोणी लावली आहे, कोणाचे पैसे आधीं दिले पाहिजेत, नाहीं तर, तो आपली फटू फजीती करण्यास चुकणार नाहीं. तर अशा सावकाराच्या देण्याचा आधीं फडशा केला पाहिजे. प्रत्येक ऋणाईत मनुष्यानें हिशोब जरूर ठेवावा. आपलें उत्पन्न किती आहे, आपणांस कोणाचें किती देणें आहे, व तें कधीं काढलें, त्यांतून फेड किती झाली, व बाकी किती आहे वगैरे सर्व गोष्टींचें टांचणही ठेवणें अति अगत्याचें आहे. याप्रमाणें नियमानें केलें तर, ऋणाईत लवकर ऋणमुक्त होईल यांत संशय नाहीं.

**व्याज व मुद्दल यांची फेड**—खर्च असा ठेवावा कीं जेणेंकरून प्रत्येक महिन्यास आपणांस कर्जाचें व्याज व कांहीं मुदलापैकीं रकम नेमानें देतां येईल. कित्येकांना हें करणें फार कठीण वाटेल. पण तसें केलेंच पाहिजे. दुसरा इलाजच नाहीं. ह्याप्रमाणें चालणें फार दुष्कर, तरी परिणामीं सुखकर होतें. ऐपतीपेक्षां ज्यास्त खर्च करण्याच्या सवयीपासून परिणामीं काटकसरीनें खर्च करणें भाग पडतें व तें फार जड वाटतें. याकरतां प्रथमच जरा कळ सोसून अंमळ आत्मसंयमनपूर्वक वर्तन केलें तर परिणाम खरोखर फार सुखकर व हितावह होईल. कर्जाची फेड करणें आहे तर नुसतें व्याज देऊन शेवट येणार नाहीं. थोड थोडी मुदलाचीही फेड केली पाहिजे नाहीं तर, व्याजाची रकम मुदलापेक्षां अधिक भरली तरी आपली मुदलाची रकम कायमच्या कायम!

उदाहरणार्थ एका मनुष्यास दरमहा ३० रुपये उत्पन्न व दोनशें रुपये देणें आहे, असें मानलें तर त्याचें टक्क्याच्या मितीचें व्याज असलें तरी दर महा व्याजापोटीं त्यास दोन रुपये द्यावे लागतात. ह्यासाठीं जरा कळ सोसून तीस रुपयांपैकीं २६ रुपयांत होईल तें करून राहण्याचा त्यानें निश्चय केला तर, रकमेची फेड किती जलद होईल हें खालीं दिलेल्या आंकड्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल. हें फक्त एकच उदाहरण दिलें. रकम कितीही मोठी असो, तिची व्याज व मुदलांतून कांहीं रकम ह्याप्रमाणें फेड केली तर कर्जाचा लवकर फडशा होईल ह्यांत संशय नाहीं.

| | फेड रुपये. | | बाकी. |
|---|---|---|---|
| | व्याज. | मुद्दल. | रुपये. |
| प्रथमवर्ष अखेर. | २४ | २४ | १७८ |
| दुसऱ्या वर्षाच्या अखेर | २१ | २७ | १४९ |
| तिसऱ्या ,, ,, | १८ | ३० | ११९ |
| चवथ्या ,, ,, | १४ | ३४ | ८५ |
| पांचव्या ,, ,, | १० | ३८ | ४५ |
| सहाव्या ,, ,, | ५ | ४३ | २ |

ह्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, ९३ रुपये व्याज भरल्यानें सहा वर्षांत कर्जाची फेड होते; पण समजा कीं, मुद्दलांत कांहींच फेड न होती तर सहा वर्षांत व्याजापोटींच १४४ रुपये उडते, आणि शेवटीं मुद्दल बोकांडीं आहे तें आहेच! म्हणून व्याजा-बरोबर मुद्दलांत कांहीं तरी फेड करीत गेलेंच पाहिजे हें उघड आहे.

**गहाण ठेवणें**—समजा, एकानें आपलें घर गहाण ठेवून त्यावर कांहीं रकम काढली. घर गेलें सावकाराच्या ताब्यांत. त्याचें भाड्याच्या रूपानें दहा पांच रुपये काय उत्पन्न होत असतील ते सावकार व्याजांत कापून घेतो. तेवढ्यानें त्याच्या सगळ्या रकमेचें व्याज देखील पुरें होत नाहीं! मग मुद्दलास हात कोठून लागतो? बरें ह्यास तर फेड करण्याचें सामर्थ्य नाहीं. मग व्याजाचें व्याज, रकमेचें व्याज, असें होतां होतां मुद्दलाची दुप्पट तिप्पट होऊन जाते! आणि शेवटीं घरदार जाऊन ‘अलख निरंजन’ बनण्याचा प्रसंग येतो! तेंच घर अगोदर विकून टाकलें असतें व कर्जाची फेड करून बाकी राहिलेली रकम ब्यांकेंत टाकली असती तर किती

फायदा झाला असता बरें? घरच कशाला, कोणतीही वस्तु गहाण टाकली तरी हीच व्यवस्था व्हायची. ह्याकरतां प्रत्येक मनुष्यानें त्याला तशीच गरज लागली तर, एकादा विशेष जरूर न लागणारा जिन्नस बेलाशक विकून पाहिजे तर आपली गरज पुरवावी, पण कोणतीही जिन्नस दुसऱ्याकडेस कदापि गहाण टाकूं नये. कित्येकांना आपली वस्तु विकणें आवडत नसतें, त्यांस तसें करणें जरा बेअब्रूची गोष्ट करणें असें वाटतें; पण तितका वेळ काय वाटेल तें वाटेल, बाकी चांगली रकम आपल्या हातांत येऊन आपला कार्यभाग होतो. पण तसें न केलें तर, गहाण टाकलेल्या मालाची घाण झाल्यावाचून राहणें नाहींच. व्याजापोटीं पैसा दुप्पट भरून देखील गहाणदार मूळ माल बळकावतो तो बेगळाच!

**उत्पन्नाचा विनियोग**—प्रत्येक मनुष्यानें आपलें उत्पन्न किती आहे व त्यांतून आपणाला खर्च किती केला पाहिजे वगैरे गोष्टींचें अगोदर टांचण करून ठेवणें फार महत्वाचें आहे. तसें केल्यानें त्यास वर्ष अखेर आपणाला एकंदर किती उत्पन्न झालें, त्यांतून आपण खर्च किती केला, आज आपणापाशीं शिल्लक किती आहे, तसेंच आपल्या हातून निष्कारण खर्च कोणकोणत्या बाबतींत झाला वगैरे सर्व गोष्टी तेव्हांच कळून येतील. समजा, एका मनुष्यास सालीना ५०० रुपयाचें उत्पन्न आहे तर, त्याच्या खर्चाचें टांचण खालीं दिल्याप्रमाणें होईल. हा हिशेब ज्याच्या त्याच्या उत्पन्नाच्या मानानें कमी जास्त करतां येईल. मुंबईसारख्या महर्गतेच्या शहराच्या खर्चाचें हें साधारण मान धरलें आहे.—

| उत्पन्न सालिना. | खर्च सालिना. | |
|---|---|---|
| रु० ५०० | घरभाडें ....................रु० | ६० |
| | पोटखर्च ....................,, | ३०० |
| | मुलांचा विद्याभ्यास वगैरे ......,, | ३६ |
| | कपडालत्ता वगैरे................,, | २४ |
| | धर्मादाय ......................,, | १२ |
| | किरकोळ आकस्मिक खर्च ......,, | १८ |
| | एकूण..........................,, | ४५० |
| | पुढल्या तर्तुदी करतां ब्यांकेंत जमा ,, | ५० |
| ५०० | | ५०० |

ह्याप्रमाणें प्रत्येक कुटुंबांतील कर्त्यामनुष्यानें पुढल्या खर्चाचें 'बजेट' ह्मणजे अर्थात् पुढें होणाऱ्या खर्चाचें ठोकळ टांचण करून त्या रकमेपेक्षां कधीं जास्त खर्च न करण्याची खबरदारी ठेवल्यानें किती हित व फायदे आहेत हें प्रत्यक्ष तसें करून अनुभव घेणारांस कळून येईल.

**खर्चाचा हिशेब**–प्रत्यहीं आपण किती खर्च करतों त्याचा प्रत्येकानें हिशेब ठेवणें हें किती महत्वाचें आहे पहा.—लॉक साहेब ह्मणतोः—Nothing is likelier to keep a man within compass than having constantly before his eyes the state of his affairs in a regular course of account. ह्मणजे—आपल्या संसाराची स्थिति कशी आहे आणि आपला आय व्यय किती आहे, याचा तपशीलवार हिशेब प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यांसमोर असल्याशिवाय त्याच्यानें हात राखून खर्च करण्याचें काम कदापि

होणें नाहीं. कित्येक असें ह्मणतात कीं 'काय आमची एवढी दौलत वाहून चालली आहे कीं त्याचा हिशेब ठेवलाच पाहिजे.' पण ही त्यांची मोठी चूक आहे. श्रीमंत आहेत त्यांना काय? लाखो येतात नि लाखो जातात. पण गरीबांनाच ह्या गोष्टीची मोठी कळकळ असली पाहिजे. पैन्पैचा हिशेब त्यांनी ठेवणें जरूर आहे. हिशेब ठेवल्यामुळें आपल्या उत्पन्नापैकीं खर्च झाला किती, बाकी राहिली किती, विनाकारण खर्च कोणत्या बाबतींत झाला, पुढल्या महिन्यांत त्यांतला खर्च किती कमी करतां येईल, वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी कळतात व त्याप्रमाणें पुढें वागण्यास ठीक पडतें.

**माल विकत घेणें**—जवळ पैसा नाहीं आणि हें घे, तें घे, असें केल्यापासून पुष्कळांचें नुकसान झालें आहे, जवळ पैसा नसला तर दोन दिवस कशी तरी अडचण काढून घ्यावी पण उधार कधींही घेऊं नये. जो रोकड मोजून जिन्नस घेतो, तो पक्का विचार करून अवश्य तेवढीच जिन्नस विकत घेतो, उधार घेणें ह्मणजे दुकानदार देईल तो माल, सांगेल ती किंमत देऊन घेणें भाग पडतें. पण ताबडतोब पैसे देऊन घेणारास चार दुकानचा माल पाहून बऱ्या वाईटाची निवड करून सवंग मिळेल तेथून घेतां येतो. तसेंच जो जिन्नस आपण घेतों त्याची किंमत व मालाची सफायी वगैरे संबंधानेंही विचार करणें योग्य आहे व तसें करण्यास त्यास बरीच सवड मिळते. ह्याकरतां जवळ पैसा असेल तेव्हांच कोणताही माल घेण्यास उडी टाकावी.

होतां होईल तों उधार ह्मणून कांहीं घ्यायचें नाहीं असा प्रत्येकानें निश्चय करावा.

**लेलावांत न जाणें**—मनुष्यस्वभाव असा कांहीं विलक्षण आहे कीं त्यानें कोणताही चांगलासा पदार्थ पाहिला कीं तो त्यास घ्यावासा वाटतोच. लेलावांत नानाविध पदार्थ दृष्टीस पडतात तेव्हां ते आपणास घेतां यावे असें वाटणें साहजिक आहे. येणेंकरून होतें काय कीं, वस्तुतः ज्याची आपणास गरज नसते असे पदार्थ खरेदी करण्यांत पैसा फुकट जातो. ह्याकरतां अशा ठिकाणीं न जातां येईल तेवढें चांगलें. पण कदाचित् जाणें झालेंच आणि अमुक एक वस्तु चांगली आहे, ती आपणास घेतली पाहिजे, असें मनांत आलें तर 'हा पदार्थ घेतां येईल येवढे पैसे मजपाशी आहेत काय' असा विचार मनांत न आणतां, 'तो न घेतला असतां चालण्यासारखें आहे कीं नाहीं' ह्याचा चांगला विचार करावा. इंग्रजीत एक ह्मण आहे कीं "He that buys what he does not need, will need what he cannot buy." ह्मणजे—जो मनुष्य गरज नसलेल्या जिनसा विकत घेतो त्याजवर असाही प्रसंग येतो कीं, गरज असलेल्या जिनसा त्यास विकत घेतां येणार नाहींत.

**मादक पदार्थांचें सेवन**—दारु, गांजा, भांग, चंडुल, चरस, गुडाखु, तंबाकु वगैरे अमली व व्यसनी पदार्थांच्या सेवनांत आज आमच्या लोकांचा किती पैसा व्यर्थ जातो आहे ह्याचा विचार करून त्यांत जेवढा कमी पैसा जाईल तेवढा चांगला, असा निश्चय

करून सर्वांनी तसें करण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. कारण ह्या बाबतींत जो पैसा जातो त्यापासून कांहीं एक फायदा न होतां नुकसान मात्र बहुत होतें. ह्मणून अशा रीतीनें तो न जाऊं देतां त्याचा देशहिताच्या कामीं विनियोग करतां येईल अशा उपायांची योजना करण्याचा सर्वांनीं प्रयत्न करावा व विनाकारण व्यसनाधीन राहून कर्जांत बुडून न जातां पैशाचा सदुपयोग करून जन्माचें सार्थक करून घ्यावें हीच आमची सर्वांस विनंति आहे.

जामिनगिरी, उसनवार, जुगार, सट्टे, दागिने, लग्नादि कार्यें वगैरे संबंधीं मागें बरेंच विवेचन झालें आहे. सांगणें ह्मणून येवढेंच कीं, यद्यपि अशा प्रसंगीं विशेष खर्च करण्याच्या रूढी आपल्या लोकांत पडून गेल्या आहेत, व जरी त्या सर्वांचें उल्लंघन आज एकदम करतां येणार नाहीं, हें खरें आहे तरी, होतां होईल तों असल्या बाबतींत विशेष पैसा न घालविण्याची खबरदारी ठेवीत गेलें, ह्मणजे असल्या अनिष्ट चाली सहज हळूहळू नाहींतशा होऊन बहुत जनसमुदाय ऋणमुक्त होईल व तेणेंकरून तो सुखी होईल हें आह्मी खातरीनें सांगूं शकतों.

**नाहीं ह्मणण्यास शिकणें:**—कित्येकांचा स्वभाव फार भिडस्त असतो. कोणी कांहीं मागितलें आणि त्यांजपाशीं तें असलें तर ते कधींहीं नाहीं ह्मणावयाचे नाहींत. मनुष्यांस प्रसंगीं उपयोगी पडावें ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं. पण अशा स्वभावानें लबाड लोकांचें साधतें आणि नुकसान होतें आपलें. मनांत आलें कीं

अमुक एक जिन्नस विकत घेतली पाहिजे; खरें, पण जवळ पैसा नाहीं, तर ती 'घ्यायची नाहीं' ह्मणून साफ ह्मणा. तुमच्यावर कर्ज आहे त्याची व्याज व मुद्दल यांच्या रूपानें तुह्मीं दरमहा फेड करीत आहां. मनांत आलें कीं, एक महिना हप्ता बंद करावा. तर ह्मणा 'नाहीं बंद करायचा.' बायका पोरें पाठीस लागलीं कीं, आह्मास अमुक पाहिजे, तमुक पाहिजे; पण तुमच्यापाशीं सध्यः ते जिन्नस घेऊन देण्याचें सामर्थ्य नाहीं तर 'सध्यः मिळणार नाहीं' ह्मणून साफ सांगा. ह्याप्रमाणें प्रत्येक निष्कारण खर्च करण्याची संधी आली असतां 'नाहीं' ह्मणून चट्कन् उत्तर द्यावें. पहिल्या पहिल्यानें असें 'असिव्रत' पाळण्याचें अंमळ कठीण पडेल खरें, पण संवईनें सर्व होऊन जातें. आज पुष्कळ कुटुंबें कर्जबाजारी झालीं आहेत, त्याचें मुख्य कारण हेंच होय कीं त्यांस 'नाहीं' ह्मणण्याची छाती होत नाहीं. तेव्हां सांगायचें ह्मणून एवढेंच कीं, अशा प्रसंगीं आत्मसंयमन करून विचारपूर्वक जें करणें तें करावें. मुलाबाळांच्या गरजा पुरवूं नये किंवा पोटास बंद बांधावा, अशांतला मुळींच अर्थ नाहीं. हें मात्र विसरतां कामा नये.

**शिल्लक ब्यांकेंत टाकणें**—आपली उद्यां काय स्थिति होईल ह्याचा विचार न करणें, आपल्या कुटुंबांतील मनुष्याच्या सुखासमाधानाची काळजी न वाहणें, मुलाबाळांच्या विद्याभ्यासासाठीं तजवीज करून न ठेवणें, फार कशाला आपल्या स्वतःच्या वृद्धावस्थेकरतां व दुखण्याबाण्याकरतां कांहींच तजवीज न करणें, ह्मणजे पशुप्रमाणें वर्तन करणें नव्हे असें कोण ह्मणूं शकेल?

अशा व अनेक आकस्मिक प्रसंगांकरतां गांठीं दोन पैसे असणें हें अत्यंत महत्वाचें आहे वगैरे गोष्टीबद्दल उल्लेख मागें झालाच आहे. पैसा जवळ असला तर खर्चून जातो, रहात नाहीं, ह्मणून शिल्लक राहील ती ब्यांकेंत टाकणें जरूर आहे. ही सोय गरीब गुरीब व मध्यम स्थितींतल्या लोकांकरतां सरकारानें केली आहे. कारण प्रापंचास लागणारा अवश्य तो खर्च जाऊन त्यांजपाशीं जास्त ती शिल्लक कितीशी राहणार? अशा ब्यांकांत एक मोठी सोय ही आहे कीं, तेथें चार आण्यापासून रकम घेतात. ह्मणून गरीब लोकांना ह्या ब्यांकांपासून फार फायदे आहेत. ते त्यांनी करून घ्यावे.

## ऋणमुक्त असल्यापासून लाभ.

**द्रव्यसंचय होतो**—कष्टार्जित द्रव्याचा किती लोट सावकाराच्या घरांत जातो ह्याविषयीं मागें बरेंच विवेचन झालें आहे, त्यावरून वाचकांची खातरी झालीच असेल कीं, द्रव्यसंचयाच्या योगानें ती यातायात नाहींशी होते. ह्मणून द्रव्यसंचय अवश्य करावा.

**पैशासंबंधीं कांहीं काळजी राहत नाहीं**—कर्जबाजारी मनुष्यास कधीं सुखानें नीज मिळत नाहीं, खाल्लेलें अन्न धड जिवास लागत नाहीं, लोकांस तोंड दाखवितां येत नाहीं, नेहमीं चिंतेमुळें जिवास तळमळ लागून राहिलेली असते वगैरे अरिष्टांपासून चिंतेच्या योगानें मनुष्याची काय दशा होते ह्याचें वर्णन खालील श्लोकांत फार चांगलें केलें आहे—

> चिता चिंता समा ख्याता बिंदुमात्रविशेषतः ।
> सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता ॥ १ ॥

ह्मणजे **चिता** जी आहे ती निर्जीव झालेल्या (मेलेल्या) मनुष्यास मात्र जाळते पण चिंता जीवंत माणसाचीसुद्धां जाळून खाक करते. ज्याला कर्ज नाहीं तो चिंतेपासून मुक्त असतो, ह्मणजे अर्थात् त्यास पैशासंबधीं कांहीं काळजी रहात नाहीं.

**धंद्या रोजगारांत मान प्रतिष्ठा मिळते**—कर्जबाजाऱ्याला सावकारांकडून शिव्यागाळींचा भडिमार सोसावा लागतो; कोणी पैसा धिरत नाहीं; पण ऋणमुक्त मनुष्य जाईल तेथें प्रतिष्ठेस पात्र होतो. त्याच्या एका शब्दानें काम होईल तेथें कर्जबाजाऱ्यानें कितीही पैसे खर्च केले तरी कांहीं होणें नाहीं.

**खरें बोलण्याची संवय लागते व प्रामाणिकपणा वाढतो**—कर्जबाजारी मनुष्य आज देतों, उद्यां देतों, ह्मणून सावकारांस नेहमीं थापावर थापा देत असतो, पण त्याच्या एकाही बोलण्यांत सत्यता नसते. ह्मणजे अर्थात् असत्य भाषण आणि विश्वासघात ह्यांची तो केवळ मूर्ति बनून जातो. पण ऋणमुक्ताची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट असते; कारण तसले प्रसंग त्याजवर येत नाहींत. तेव्हां अशा यातायाती त्याला नसणें हें साहजिक आहे.

**चांगल्या कर्मांत प्रवृत्ति—दया धरमका मूल है** ह्या **तुलसीदासोक्ती**प्रमाणें ज्याच्यापाशीं द्रव्य आहे तो अनाथ, दुर्बल, पंगु वगैरे दयापात्र लोकांवर उपकार करूं शकतो. कर्जबाजाऱ्याला स्वतःचीच पंचाइत, तेथें तो दुसऱ्यावर उपकार आणि दया कोठून करणार ?

**कुटुंबस्वास्थ्य**— ऋणाईताच्या कुटुंबाची काय तारांबळ होते, त्यांस किती संकटें भोगावीं लागतात, व अंतीं त्यांची दुर्दशा कशी होते, हें वारंवार सांगितलें पाहिजे असें नाहीं; कारण एकी व संप किती मोठमोठीं कार्यें आज या जगांत करित आहेत हें आपण नित्यशः पहात आहों. जेथें एकीच्या उलट दुही माजलेली असते तेथें कलहादी कारणांमुळें धुळीस मिळालेलीं बहुत कुटुंबें दृष्टीस पडतात. तेव्हां तेथें कुटुंब स्वास्थ्य कोठून राहणार !

## थोडा बोध.

थोडक्यांत तरी पण आमच्या मतें बहुतेक मुख्य मुख्य मुद्यांचा विचार वाचकांपुढें सादर केलाच आहे. विनाकारण विशेष पाल्हाळ करून वाचकांस कंटाळा आणणें आह्मास प्रशस्त दिसत नाहीं; करितां हे शेवटचे दोन शब्द सांगून त्यांची रजा घेतों.

वर एका ठिकाणीं 'आकस्मिक कारणें' ह्या सदरा खालीं मनुष्यास कर्ज काढणें भाग पडतें ह्मणून ह्मटलें आहे. पण अशा प्रसंगविशेषीं काढलेल्या कर्जाची देखील फेड करणें अत्यंत महत्वाचें कृत्य होय. कोणी ह्मणेल कीं, आह्मी स्वसंतोषानें तें थोडकेंच काढलें आहे ! तें काढणें संकटावस्थेमुळें भाग पडलें. मग तें न दिलें ह्मणून काय झालें ? आह्मास मिळेल तर देऊं; न मिळा-ल्यास आमचा काय इलाज आहे ? सावकारानें तें आ-ह्मास उदार बुद्धीनें थोडकेंच दिलें आहे. व्याजाच्या आशेनेंच दिलें. हे सर्व विचार खरे; पण पहा बरें—आपण

संकटावस्थेंत असतां ज्यानें पैसा देऊन—व्याजाच्या आशेनें दिले असें कां ह्मणाना—आपणास संकटापासून मुक्त केलें, अशा मनुष्याचे पैसे परत न देणें ही गोष्ट किती वाईट आहे बरें? विचार करा. तो पैसा तुमचा तर नव्हेना? मग ज्याचा त्यास नको का द्यायला? वरच्या प्रकारचे उद्गार काढणारे सर्वच लोक असतात असें नाहीं. जगांत सत्य आजच नाहींसें झालें नाहीं. पापभीरु, प्रामाणिक, सत्यावलंबी असे बहुत लोक आहेत. ह्मणूनच पृथ्वी चालली आहे. फार दिवसांवर वाचलेल्या व ह्या ह्मणण्याची सत्यता दाखविणाऱ्या एका अमेरिकन व्यापाऱ्याच्या गोष्टीची आह्मास आठवण झाली. ती गोष्ट वाचकां करतां आह्मी खालीं दिली आहे:—

वर ह्मटलेल्या व्यापाऱ्याचें मूळ गांव **अमेरिका.** व्यापारा निमित्त तो इंग्लंडांत राहत असे. हा गृहस्थ मोठा प्रामाणिक असे. कर्मधर्म संयोगामुळें ह्मणा किंवा कोणत्याही कारणानें ह्मणा त्यास व्यापारांत तोटा आल्यामुळें त्याचा धंदा अगदीं बसला. तेव्हां त्याच्या मागें कर्जदारांचे तगादे लागले. देण्यास जवळ नाणें नाहीं. मग काय? सरकारमार्फत त्याची जी काय स्थावर मिळकत होती ती विकून आलेल्या पैशानें कर्जदारांची रुपयास आणा दोन आणे ह्या प्रमाणें भरपाय करून त्यांच्या पावत्या घेतल्या. पुढें तो भला व्यापारी स्वदेशीं परत जाऊन त्यानें तेथें पुनः व्यापार चालविला. दैववशात् त्यांत त्याला अल्प काळांतच बराच नफा झाला. आतां आपणांजवळ सर्व कर्जदारांच्या पैशाची भरपाय करतां येईल इतका पैसा झाला आहे असें पाहून तो

पुनः इंग्लंडास परत आला. तेथें जाऊन सर्व कर्जदारांच्या बाकी राहिलेल्या पैशाच्या ह्मणजे ज्याचे जेवढे पैसे असतील तेवढ्या रकमेच्या हुंड्या केल्या आणि प्रत्येकाच्या नांवाचे लाखोटे करून ते एकेका तबकांत घालून तीं सर्व तबकें रुमालांनी झांकून मेजावर मांडलीं व आपल्या सर्व ऋणकोंस मेजवानी करतां आपल्या घरीं बोलावलें. त्यांस आपापल्या नांवाच्या तबकावर बसविले. त्यांनीं वरून रुमाल काढतांच आंत आपापल्या नांवाची चिठी त्यांच्या दृष्टीस पडली! त्या फोडून पाहतां आपल्या बाकी राहिलेल्या रकमेच्या सव्याज हुंड्या निघालेल्या पाहून त्यांस परमाश्चर्य झालें असेल हें सांगणें नकोच. वाचकहो, हें औदार्य व हा प्रामाणिकपणा काय सामान्य समजावा? पण हें कशाला? परकीयांचें उदाहरण आपणांस कशास पाहिजे? आमच्या देशाच्या इतिहासांत असलीं नाहींत का उदाहरणें? होय आहेत. राजा हरिश्चंद्राची हृदय द्रावक गोष्ट सर्वांस विश्रुत असेलच. वरच्या गोष्टींत तर खरोखर लोकांचा पैसा थकला होता. पण हरिश्चंद्रानें तर स्वप्नांत दान केलें! व त्याची राहिलेली बाकी त्यानें कशी फेडली व ती फेड करतांना त्याच्या किती हाल अपेष्टा झाल्या हें तर सर्वांस विश्रुत असल्या कारणानें त्याचा येथें विस्तार करण्याची जरूर दिसत नाहीं.

वरच्या दोनही गोष्टींवरून तात्पर्य काय काढायचें कीं, कर्ज जें आहे तें फेडलेंच पाहिजे. तें सुटत नाहीं व प्रामाणिक मनुष्यें तें फेडल्यावाचून राहवयाचे नाहींत. ह्मणून प्रत्येकानें कर्ज काढते वेळीं चांगला पोक्त विचार

केल्यावाचून आगींत उडी टाकूं नये, हेंच त्यांस सांगणें आहे.

सुख प्राप्त करून घेण्याला कांहीं अंशीं विपुल संपत्ति असणें कारणीभूत असते. हें खरें आहे. पण ती कोणत्या मार्गानें संपादन करायची ह्या गोष्टीवर विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. ह्मणजे द्रव्य संपादन करणें तें न्यायाच्या मार्गानें संपादन केलें पाहिजे. स्वकष्टार्जित, प्रमाणिकपणानें, न्यायानें, सचोटीनें वगैरे ज्या मार्गानें महाजन द्रव्यार्जन करतात त्याच मार्गाचें अवलंबन करून द्रव्यार्जन करणें योग्य होय. अन्यायानें व अनीतीनें संपादन केलेलें द्रव्य संपादन करणाराचें नसल्यामुळें तें त्याचें असें ह्मणतां येत नाहीं. ह्मणून तें त्याच्या जवळ फार दिवस राहात नाहीं. मिळवणारा मिळेल तसें, कोणत्या पाहिजे त्या मार्गानें, द्रव्य मिळवतो पण पुढें असें होतें कीं, तें ज्या मार्गानें आलें त्या मार्गानें चालतें होतें. कांहीं वर्षांपूर्वी जे लोक फार सधनांत गणले जात त्यांची मुळेंबाळें आज फार दैन्यावस्थेंत असलेलीं पाहण्यांत येतात, ह्या करतां प्रामाणिकपणानें, न्यायानें व नितीनें द्रव्यार्जन करून सुखासमाधानानें नांदणें फार चांगलें हें सर्वांच्या लक्षांत येऊन चूकलेंच असेल.

गृहकलहामुळें आज बहुत कुटुंबें कर्जांत बुडून गेलीं आहेत. ह्या कलहाचीं कारणें पाहूं गेलें तर फार क्षुल्लक असतात. व तीं उद्भवतात आधीं स्त्रियां कडून. ह्याचें मूळ कारण त्यांचा अडाणीपणा. त्यांस त्यांच्या आया सुशिक्षित नसल्यामुळें सुशिक्षा कशी ती ठाउक

नसते. मग त्यांच्या आंगीं बरें वाईट, हिताहित जाणण्याची शक्ति कोठून येईल? तसेच आमचे सुशिक्षा मिळालेले, नांवा लौकिकास आलेले, विद्वानांत मोडणारे, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध अशा लोकांकडून देखील कधीं कधीं कलहास सुरुवात होते, अशीं उदाहरणेंही क्वचित पाहण्यांत येतात. ही फार शोचनीय गोष्ट. कधीं कधीं तर हा कलहाग्नि इतका भडकून जातो कीं, त्याची शांति दिवाणी, फौजदारी कोर्टरूपी उदकानें करावी लागते. स्टांप, वकील बारिस्टर वगैरेस औदार्नें देतां देतां दोनही पक्षकार इतके टेकीस येतात कीं, ते ह्या कलहाच्या पायीं सर्वस्वी नागवले जातात! तीच थोडकीशी कळ सोसून अगोदर आपापसांत समजूत करून तंटा मिटविला असता तर किती फायदा झाला असता बरें? प्रिय वाचकहो, दुरभिमान, गर्व, ताठा, इत्यादि अवगुण सोडा, व आपलें व आपल्या कुटुंबाचें हित कोणत्या उपायांनी करतां येईल, अशा उपायांची योजना करण्यास लागा, असें असल्या हेकड लोकांस, तुह्मींच सांगा आणि त्यांचे चांगले कान उघडा, व त्यांस शांति व सुख ह्यांचा लाभ करून घेण्यास लावा.

ज्यांस आपल्या घरांत शांति राहावी असें वाटत असेल व आपण ऋणमुक्त होत्सातां सुखानें संसार करावा अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं आधीं स्त्रियांस सुशिक्षित करण्याच्या प्रयत्नास लागलें पाहिजे. आतां ज्या स्त्रिया वयातीत आहेत त्यांची सुधरण्याची आशा बाळगणें व्यर्थ होय; त्या खटपटींत फारसें कोणी पडूं नये. पण प्रत्येकानें आपापल्या मुली सुशिक्षित करण्याच्या

कामांत होईल तो प्रयत्न करणें फार इष्ट आहे व तें प्रत्येकानें केलें पाहिजे असें त्यांस आग्रहपूर्वक आमचें सांगणें आहे. मुलीस सुशिक्षा लावून त्या आपला संसार मोठ्या टापटिपीनें, दक्षतेनें व कसोशीनें करतील अशा तऱ्हेचें त्यांस वळण लावणें हें प्रत्येक मातापितरांचें काम होय. तें त्यांनीं बरोबर न केलें तर पुढें संसारांत मुलांच्या हातून ज्या चुका होतील त्यांबद्दल त्यांचे आईबाप दोषी ठरतील हें उघड आहे. ह्यासाठीं सर्वांस आमचें सांगणें येवढेंच आहे कीं, आपापल्या मुलींना सुशिक्षा देण्यांत बिलकुल आळस करूं नका. येवढें तुह्मी केलेंत कीं तुमचें कर्तव्य तुह्मीं बजावलें असें होईल. व तेणेंकरून भावी संततीला किती फायदे होतील हें सांगण्याची गरज नाहीं.

तसेंच मुलांच्याही सुशिक्षेकडे मातापितरांनी लक्ष पुरविलें पाहिजे. व तीं विशेषतः शाळेंत असतांना त्यांच्यावर फार लक्ष ठेवलें पाहिजे, नाहींतर तीं दुष्ट संगतीपासून बिघडण्याची फार भीति असते. त्यांच्या तारुण्यावस्थेंतही त्यांस कुसंगती व दुर्व्यसनें न लागतील अशी खबरदारी ठेवली पाहिजे.

शेवटीं सर्वांस सविनय येवढेंच सुचविणें आहे कीं, ज्यास ऋणमुक्त होत्साता आपला संसार सुखानें करण्याची इच्छा असेल त्यानें खाली दिलेल्या गोष्टींकडे अवश्य लक्ष्य पुरवून त्याप्रमाणें वागण्याचा दृढ निश्चय करावा.

संसारांत नेहमीं खरें बोलण्याची संवय लावून घ्यावी. सर्वांबरोबर सचोटीनें व प्रामाणिकपणानें वागावें. कोणा बरोबर कपट करूं नये. दुसऱ्याच्या द्रव्याचा अभिलाष

करूं नये. आपणाजवळ कोणी विश्वासानें ठेव दिली तर ती तो मागेल तेव्हां त्यास परत द्यावी. त्याचा अपहार कधीं करूं नये ह्मणजे अर्थात् कोणाचा विश्वासघात करूं नये. आपल्या ऐपतीप्रमाणें खर्चाचें मान ठेवावें, ह्मणजे मितव्यय करण्यास शिकावें. सर्व दुर्व्यसनांपासून दूर राहावें. उत्पन्नांतून कांहीं तरी शिल्लक मागें टाकावी. सर्व निरर्थक खर्च अगदीं कमी करावें. सर्व कामांत नियमितपणा ठेवावा. कोणास जामीन कधीं राहूं नये. उसनवार देण्याची संवय कमी करवेल तेवढी चांगली. निरंतर संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करावा. संपादन केलेल्या द्रव्याची उगीच धूळधाणी न करतां त्यांतून कांहीं तरी मागें टाकण्यास विसरूं नये. आणि मिळालेल्या संपत्तीचा चांगला पोक्त विचार करून सद्विनियोग करावा.

वर नमूद केलेल्या मुख्य मुख्य गोष्टींचें चांगलें मनन करून त्यांप्रमाणें वागणारा कधींही विपत्तींत पडावयाचा नाहीं. तो निश्चयानें **ऋणमुक्त** होईल.

ह्याप्रमाणें ऋणमुक्त असल्यानें कसकसे फायदे होतात ह्याचें संक्षिप्त विवेचन प्रिय वाचकांच्या सेवेंत सादर केलें. आतां, ह्या सर्व विवेचनावरून लोभ्याप्रमाणें द्रव्यसंचयच करावा, त्याचा कांहीं उपयोग करूं नये, पोरांबाळांना सुद्धां तीं मागतील त्याला 'नाहीं' ह्मणावें, आणि मिळेल तेवढा पैसा पेटींत घालून ठेवावा असें मुळींच आमचें ह्मणणें नाहीं. तर पैशाचा सदुपयोग करण्यास शिकून ऋणमुक्त होत्सातां संसाराचें सार्थक करून घ्यावें एवढेंच आमचें सर्वांस सांगणें आहे.

याप्रमाणें आह्मीं वाचकांची यथामति सेवा केली. तेवढ्या सर्व विवेचनावरून आमच्या वाचकांची खात्री झालीच असेल कीं, मनुष्यानें होतां होईल तों ऋण ह्मणून कधीं काढूं नये. व त्याप्रमाणें त्यांनी वागावें ह्मणून परमेश्वरानें त्यांस सद्बुद्धि द्यावी अशी त्यापाशीं आमची करद्वय जोडून सविनय प्रार्थना आहे, तीं तो मान्य करो ह्मणजे आमचा हेतु सफळ झाला.

## उपसंहार.

पैशाचा उपयोग कसा करावा, हें ठाऊक नसल्या-कारणानें मनुष्यावर अत्यंत दुर्घट प्रसंग येतात हें मागील सर्व विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल; तेव्हां त्यासंबंधीं विशेष न लिहितां शहाण्या लोकांनीं पोक्त विचार करून स्वानुभवपूर्वक लेख लिहून ठेवले आहेत, त्यांतून कांहीं सारभूत गोष्टींचा किंचित् उल्लेख करून हा विषय पुरा करूं.

**दाक्तर जॉन्सन** हा अति दरिद्री होता. त्यास क-र्जेही पण बरेंच होतें. त्याच्या जोड्यास शंभर ठिकाणीं भोकें आणि ठिगळें. अशी त्याची बाल्यावस्थेंतील स्थिति ! कर्जाच्या बाबतींत त्यानें आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें आहे, त्यांत तो ह्मणतोः—

दरिद्री मनुष्यास कोणावर परोपकार करतां येत नाहीं, किंवा दुर्वर्तनापासून पराङ्मुख होण्याचें सामर्थ्य देखील त्याच्या आंगीं रहात नाहीं. ह्मणून दुसऱ्यापासून कर्ज ह्मणून काढावयाचें नाहीं, आणि गरीबही राहव-याचें नाहीं, असा मनाचा निग्रह करून वागलें पाहिजे.

तेव्हां अर्थात उत्पन्नापेक्षां खर्च कमी ठेवणें अवश्य होय. दारिद्र्यावस्था ही मोठी सौख्यनाशिनी आहे. तिजपासून स्वातंत्र्य तर कधींच मिळावयाचें नाहीं. आंगचे सद्गुण ह्यांचाही ती नाश करणारी आहे. काटकसरीनें खर्च करणें हें शांति व दातृत्व ह्यांचें आदिकारण होय. ज्याला दुसऱ्याच्या साहय्याची अपेक्षा असते, तो आपलें स्वतःचें कितीसें सहाय्य करूं शकेल? कोणताही पदार्थ दुसऱ्यास देण्यापूर्वीं आपल्या स्वतःच्या गरजा पुरून शिलक राहील कीं नाहीं याचा पूर्ण विचार करावा. कर्जाच्या योगानें मनुष्याची पत जाते, कोठें मान मिळत नाहीं, धंद्या रोजगारांत ज्यांच्याशीं त्याचा संबंध असतो त्यांच्यापुढें केविलवाण्या मुद्रेनें त्याची करुणा भाकावी लागते, आणि सेवकजनांचेंही, त्यांच्या पगारा करतां, बरेच वाग्बाण सहन करावे लागतात. अशा प्रकारें तो बहुतांशीं केवळ गुलाम बनून जातो. ऋणाईतास खरें बोलणें फार जड जातें. आद्यापेक्षां खर्च जास्त नसणें हें प्रमाणिकपणाचें मूळ बीज होय. कारण ज्याला आपल्या स्वतःच्या कष्टार्जित उत्पन्नावर राहतां येत नाहीं, त्याला अप्रामाणिकपणानें दुसऱ्याच्या उत्पन्नावर राहणें भाग पडतें. मितव्यय ही शहाणपणाची कन्या, मिताशनाची बहिण आणि दातृत्वाची माता असून मितव्यय हा एक संपत्तीचा उत्तम झरा होय.

**बेंजामिन फ्रांक्लिन** ह्याचें नांव सर्वांस ऐकून ठाऊक असेल. तो गेल्या शतकांत युनैटेडस्टेटस्मध्यें होऊन गेला. पूर्वीं त्याची फार दरिद्रावस्था होती, पण तो आपल्या उद्योगानें पुढें फार थोर झाला. त्यानें

छापलेल्या आल्मनाकांतील 'संपत्ति मिळविण्याचे उपाय' या विषयासंबंधीं तेथील लोकांस एका प्रसिद्ध लेलावाच्या ठिकाणी जो त्यानें उपदेश केला आहे तो अति सुरस व अनुकरणीय आहे, करितां त्यांतील सारांश आह्मीं आमच्या प्रिय वाचकांकरतां खालीं देतों:—

"मित्रहो, ज्या करांबद्दल तुह्मीं ह्मणतां, ते कदाचित् देण्यास खरोखर जड असतील. पण सरकारचेच नुसते कर आपणांस द्यायचे असते तर ते आपण सुखानें दिले असते, पण आपणास दुसरेही बहुत कर द्यायचे आहेत. ते आपणांतून बहुतेकांस फार दुःसह असे आहेत. सरकारच्या करांपेक्षां आळसानें आह्मावर दुप्पट कर लादले आहेत, आमच्या गर्वानें आह्मावर तिप्पट लादले आहेत आणि आमचें मूर्खत्व आह्मावर चौपट कर लादीत आहे. आमची १० तास नोकरी करा असें सांगणारें सरकार आह्मांवर फार जुलूम करीत आहे असें आह्मास वाटतें. पण आळस आणि निरुद्योगीपणा ह्यांनी आह्मास किती ग्रासून टाकलें आहे व त्यामुळें होणाऱ्या रोगादिकांपासून आमचें आयुष्य किती क्षीण होत आहे, ह्याचा कोणी विचार केला आहे काय? ह्याकरतां तुह्मी तुमच्या जीविताची पर्वा करीत असलां तर, आपला वेळ उगीच व्यर्थ दवडूं नका. वाजवीपेक्षां झोपेंत आमचा वेळ किती व्यर्थ जात आहे बरें! तेव्हां ही निद्रावस्था सोडा, जागे व्हा आणि उद्योगाला लागा. उद्योग करणें तोही पण ज्यापासून संसाराचें सार्थक

---

१ तुकोबांनी ह्मटलें आहे—तुका ह्मणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥ १ ॥

होईल असाच करा. आळशाला सर्व गोष्टी दुःसाध्य अशा वाटतात पण त्याच उद्योग्याला सुकर अशा होतात. जो नेहमीं उशिरां उठतो त्यानें सारा दिवस काम केलें तरी तें खपतही नाहीं, कीं वेळेवर तयारही पण होत नाहीं. आळसाची इतकी मंद गति आहे कीं, त्यास द्रारिद्य लवकर गांठतें! पुढच्या आशेवर कालक्रमणा करणारे लोक बहुधः उपाशीच मरतात. जो मनुष्य उद्योगी आहे तो कधीं उपाशी मरणार नाहीं. आज करतां येण्यासारखें काम उद्यांवर टाकूं नका. कोणतेंही काम 'मला कसें करतां येईल' असें ह्मणून स्वस्थ बसूं नका. त्याचा पुरा पाठलाग करा. मध्येंच सोडून देऊं नका. असें केल्यानें हळू हळू कां होईना, पण तुह्मास सिद्धि खचित येईल. उद्योग करणें तो दृढ निश्चयानें आणि नेमानें करीत जा. कोणत्याही बाबतींत सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून राहूं नका. दुसऱ्यावर सर्व गोष्टींत विश्वास टाकूं नका. सर्व कामावर स्वतः देखरेख ठेवा. काळजीनें आपलीं कामें करा. खर्च वेंच बेताबातानें आणि काटकसरीनें करा आणि आपल्या उत्पन्नांतून कांहीं रकम-मग ती कितीही थोडी कां असेना—मागें टाकीत जा. खाणें, पिणें, नाच तमाशे, गाणें, बजावणें ह्यांत व्यर्थ पैसा जाऊं देऊं नका. आपण संपत्तिमान व्हावें अशी तुमची इच्छा असली तर पैसा मिळविण्याचा जसा प्रयत्न करतां तसाच दोन पैसे मागें टाकण्याचा करा. मिळेल तो सर्व पैसा उधळून न टाकतां जेणेंकरून चार पैसे मागें राहतील असें करा. एकादा दुर्गुण ह्मणा किंवा एकादें व्यसन ह्मणा, एकदां

मनुष्यास जडलें कीं त्याचे आनुषंगिक दुर्गुण किंवा दुर्व्यसनें सकुटुंब सपरिवार त्याच्या पाठीमागें आलींच ह्मणून समजा. तुह्मांला असें वाटत असेल कीं, आज कोठें चहा, उद्यां कोठें मद्यपान, आज काय मेजवानी, उद्या काय छानछोकीचा पोषाख, परवा कोठें 'पार्टी' अशी मधून मधून मनुष्याला थोडी बहुत तरी करमणुकी करतां गंमत करणें इष्ट आहे. असा एकादवेळ थोडासा पैशाचा व्यय झाला तर त्यांत काय मोठासा खर्च होणार आहे ! असें ज्यांचें मत असेल त्यांनीं 'राईचा पर्वत होतो' हें मात्र पक्कें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ह्याकरतां असल्या लहान लहान खर्चाच्या बाबतींविषयीं तर मोठी दक्षता ठेवणें जरूर आहे. येवढें मोठें जहाज असतांना, पण त्याला एकदां इवलेंसें छिद्र पडलें आणि तें वेळींच बंद न केलें तर, कालेंकरून त्या जहाजाला तें तळीं घेऊन जाणार ! ज्याच्या जिव्हेला विशेष स्वाद असतो त्याला तें दारिद्र्यसूचक कुलक्षणच आहे असें समजलें पाहिजे.

मित्रहो, तुह्मीं ह्या ठिकाणीं लेलांवातून एकादी चांगलीशी जिन्नस मिळाल्यास घ्यावी ह्या उद्देशानें जमलां आहांत, कारण लेलावांत माल स्वस्त मिळतो असा साधारण तुमचा समज आहे. पण ज्याची वस्तुतः मुळींच गरज नाहीं असा पदार्थ विकत घेण्याची संवई असली ह्मणजे कधीं कधीं असे प्रसंग येतात कीं, ज्यांची आपणांस बहुत जरूर आहे असे जिन्नस विकावे लागतात ! अशा निष्कारण खर्चामुळें पुष्कळांवर दारिद्र्याचा घाला पडून ज्यास त्याचें कधीं दर्शनसुद्धां झालें नसेल

अशा मनुष्यापुढें जाऊन कर्ज काढण्याकरतां तोंड वेंगाडावें लागतें! ह्याकरतां गरिबांनीं मोठ्यांचें अनुकरण कधीं करूनये. 'फुगून फुगून मी बैलायेवढा मोठा होईन' हें जसें बेडकाचें बोलणें व्यर्थ, तसेंच सधन लोक करतात तसेंच जर एकादा गरीब मनुष्य मी करीन ह्मणेल तर, बेडकाप्रमाणें पोट फुटून मरून मात्र जायचा! ह्या करतां मित्र हो, अशा विनाकारण पैशाची उधळपटी करण्याच्या दुष्ट संवई सोडून द्या, ह्मणजे तुह्मांस 'दिवस फार कठीण आले. जवळ पैसा रहात नाहीं, कर ज्यास्त वाढले,' वगैरे अनेक कुरकुरी करण्यास कांहीं विशेष कारणें राहणार नाहींत."

ह्याप्रमाणें आणखीं बहुत बोधवचनें दाखवितां येतील, पण विस्तार फार झाला. तरी पण वाचकांची रजा घेतां घेतां हेंही पण सांगणें अवश्यक आहे कीं, हे चार शब्द त्यांनीं लक्षपूर्वक वारंवार वाचून त्यांचें मनन करून त्यांप्रमाणें वागण्याचा प्रयत्न केल्यानें ते ऋणमुक्त होत्साते संसारसुखाचा लाभ बराच घेतील ह्यांत संशय नाहीं. पण आमचे समज, आमच्या चाली रीती, आमचे सर्वांगी खिळलेलें अज्ञान, वगैरे अनर्थकारक विचार एकदम नाहींतसे होण्यास बराच काल लागेल हेंही येथें कबूल करणें भाग आहे. ह्याकरितां आईबापांनीं आपल्या मुलांबाळांच्या मनांत ह्या निबंधाचीं मूलतत्वें भरून देण्यास लवमात्रही आळस करूं नये. असें आमचें त्यांस फार फार सांगणें आहे. कारण मुलें ही भावीसृष्टि आहे. त्यांस जसें वळण लावावें किंवा जसा कित्ता घालून द्यावा, त्याप्रमाणें त्यांचे वर्तनक्रमांत बदल होत जातो.

शेवटीं वाचकांपाशीं हेंच मागणें आहे कीं होतां होईल तों ह्या लेखांतील आशयाप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा आणि ज्या दुःखांत आपण लोळत आहों, त्यांत आपली संतती पडणार नाहीं, अशाबद्दल उपाय योजण्यास बिलकुल विसरूं नका. ह्या गोष्टी चांगल्या ध्यानांत वागवून तसें वर्तन करीत जा म्हणजे तुम्हास दारिद्य स्पर्शही करूं शकणार नाहीं. आणि तुम्ही ऋणमुक्त व्हाल.

समाप्त.

The following Books can be had at **DUBHASHI & Co.,** *Girgaum Back Road*, Bombay.

Price 12 Annas.] **Ramavijaya** [Postage 1 Anna.

*With Illustrations*

Dedicated to the Hon'ble Mr. Justice Telang.

———o———

In one] **Harivijaya and Sivalila.** [Volume.

Price 12 Annas) *With Illustrations.* (Postage 1 Anna.

Dedicated to Rao Bahadur K. C. Bedarkar of Indore.

---

( *Sanctioned as a Prize and Library Book.* )

In] **The Arya Bhagini** [Marathi.

**Volume I**

By

Mrs. MANAKBAI LAD.

Price 1 Rupee; Postage 1 Anna.

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कुटुंबसुधारणा ... ... ... ... | रु. | ० | २ | ० |
| दारूपासून अनर्थ ... ... ... | ,, | ० | १ | ० |
| नीति संवाद ... ... ... ... | ,, | ० | १ | ० |
| भोजनबंधु पानतंबाखू ... ... ... | ,, | ० | ३ | ० |
| पत्रावळी व द्रोण ... ... ... | ,, | ० | १ | ० |
| सुलेखन विद्या ... ... ... ... | ,, | ० | २ | ० |
| सत्यनिरूपण ... ... ... ... | ,, | ० | ५ | ० |
| रॉयल रीडर नंबर १ चें मिनिंग ... ... | ,, | ० | २ | ० |
| संगीत चंद्रानना नाटक ... ... ... | ,, | ० | ८ | ० |
| फयाशनबल यंग बॉय ... ... ... | ,, | ० | ४ | ० |
| लोकरीचें विणकाम शिकण्याचें पुस्तक... ... | ,, | ० | १२ | ० |
| An Hour with the History of England & India ... ... ... ... ... | Rs. | 0 | 2 | 6 |
| Brief History of India by R. S. Taki B. A. | ,, | 0 | 8 | 0 |
| Copious Notes on Deserted Village with Paraphrase ... ... ... ... | ,, | 0 | 8 | 0 |
| A Manual of Analysis of Sentences ... | ,, | 0 | 1 | 0 |

N. B. *Orders must be accompanied by remittances. Otherwise, books will be sent by V. P. P.*